# भारतीय राजकीय व्यवस्था

## भारतीय संविधानाची चौकट

प्रकरण 1] :- भारतीय राज्यघटनेचा परिचय
अ] संविधान निर्मिती प्रक्रियेचा इतिहास
आ] सरनामा
इ] मूलभूत वैशिष्ट्ये

प्रकरण 2] :- राज्यघटना व नागरिक
अ] मूलभूत हक्क - कलम 14 ते 19
आ] मूलभूत हक्क - कलम 20 ते 32
इ] राज्याच्या धोरणाची निर्देशक तत्वे

प्रकरण 3] :- कायदेमंडळ व न्यायमंडळ
अ] संसद
आ] न्यायव्यवस्था
इ] न्यायालयीन सक्रियता

प्रकरण 4] :- कार्यकारी मंडळ
अ] केंद्रिय कायदेमंडळ - राष्ट्रपती
आ] पंतप्रधान व त्याचे मंत्रीमंडळ
इ] स्थानिक स्वराज्य संस्था - 73 व 74 वी घटना दुरुस्ती व तिचे अंमलबजावणी

Dr. Dattatray S. Sawant

## प्रकरण 1] :- भारतीय संविधानाची चौकट

प्रश्न 1] भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीचा इतिहास विषद करा ?

अ] प्रास्ताविक :-

राज्यघटना म्हणजे एक असा निश्चित दस्तावेज की ज्यावर देशाची राजकीय व्यवस्था आधारलेली असते. सी. एफ. स्ट्रॉंग यांच्यामध्ये राज्यघटना म्हणजे अशा तत्त्वांचा संच की ज्यामध्ये शासनाची सत्ता, नागरिकांचे हक्क, त्या देशातील राज्यकारभाराची पद्धत निश्चित केलेली असते. थोडक्यात राज्यकारभार चालवण्यासाठी निर्माण केलेल्या सर्व कायद्याची संहिता म्हणजे राज्यघटना होय.

ब] ऐतिहासिक पार्श्वभूमि :-

प्रत्येक देशाची राज्यघटना निर्माण होत असताना त्या देशातील ऐतिहासिक घडामोडीचा प्रभाव राज्यघटनेवर होत असतो भारतीय राज्यघटना निर्माण होताना स्वातंत्र्यचळवळ, वेगवेगळ्या विचारप्रणाली तत्कालिन विचारवंताचे विचार व ब्रिटिश राजवट यांचा प्रभाव पडला आहे. पूर्ण ब्रिटिश भारतात आल्यानंतर हळूहळू त्यांनी भारताचा राज्यकारभार आपल्या ताब्यात घेतला. त्याला विरोध म्हणून भारतीयांनी अनेक वेळा उठाव केले. उदा.,, 1757 चे प्लासीचे युद्ध, 1857 चा क्रांतीकारी उठाव, या सर्वांमुळे ब्रिटिशांनी विविध कायदे केले.

क] ब्रिटिशकालीन कायदे :-

भारतीय राज्यघटना निर्माण होत असताना, ब्रिटिश काळात झालेल्या अनेक कायद्यांचा प्रभाव तिच्यावर पडला आहे. तर राज्यघटनेचा स्त्रोत म्हणून ब्रिटिश राज्यघटनेकडे पाहिले जाते. त्या कायद्यांचा आढावा पूढीलप्रमाणे आहे.

1] 1773 चा रेग्युलेटिंग ॲक्ट :-

बंगालच्या गव्हर्नर जनरल ला राज्यशासनात मदत करण्यासाठी कार्यकारी परिषद स्थापन करण्यात आली. कलकत्ता येथे 1774 मध्ये सर्वोच्च

न्यायालयाची स्थापना करण्यात आली

२] 1833 च्या चार्टर ॲक्ट :-
ब्रिटिशांच्या वसाहतीकरणाला चार्टर कायद्याने मान्यता देण्यात आली. तसेच बंगालच्या गव्हर्नल जर्नल हा भारताचा गव्हर्नल जर्नल बनला

३] 1853 च्या चार्टर ॲक्ट :-
या कायद्यानुसार कार्यकाली व कायदेविषयक अधिकाऱ्यांचे कार्याचे विभाजन करण्यात आले. प्रशासनामध्ये सनदी सेवकांच्या भरतीसाठी खुल्या स्पर्धेचे तत्व स्वीकारले. तसेच ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभारात ब्रिटिश राजपदाचे सहा अधिकारी समाविष्ट करण्यात आले.

४] 1858 च्या गव्हरमेंट ऑफ इंडिया ॲक्ट :-
या कायद्यानुसार ईस्ट इंडिया कंपनीकडील अधिकार काढून ब्रिटिश राजपदाकडे दिले. तसेच कॉन्सील ऑफ इंडिया स्थापन करण्यात आले. त्यानुसार भारताचे प्रांतात विभाजन केले. प्रांताचे अधिकार प्रांताधिकारी म्हणून गव्हर्नल कडे देण्यात आले.

५] 1861 च्या इंडियन कॉन्सील ॲक्ट :-
या कायद्याने कायदे निर्माण करण्याच्या प्रक्रियेत भारतीयांना सहभागी करून घेण्याचे ठरले. तसेच त्यासाठी प्रांतिक कायदे मंडळांची तरतुद करण्यात आली. कायदेविषयक अधिकारांचे विकेंद्रीकरण करून मंत्रालयाची तरतुद करण्यात आली.

६] 1892 च्या इंडियन कॉन्सील ॲक्ट :-
या कायद्याने कायदे मंडळाला अंदाज पत्रकार चर्चा करण्याचा प्रश्न विचारण्याच्या अधिकार मिळाला. तसेच मर्यादित स्वरूपाचे निवडणुकीचे तत्व स्वीकारण्यात आले.

7] 1909 च्या मोर्ले - मिंटो सुधारणा कायदा :-
भारतीय स्वातंत्र्यचळवळीमुळे ब्रिटिशांना 1909 मध्ये मोर्ले - मिंटो सुधारणा कायदा करावा लागला. या कायद्यानुसार भारतात प्रातिनिधिक शासनाची संकल्पना कायद्याने प्रस्तापित झाली. निवडणुकीतून प्रतिनिधींची निवड हे महत्त्व तत्त्व स्वीकारले गेले. तसेच मुस्लीमांसाठी जातीय मतदार संघांची तरतूद करण्यात आली.

8] 1919 चा मॉन्टेग्यू - चेम्सफर्ड सुधारणा कायदा :-
या कायद्यानुसार भारतात उच्चायुक्त हे पद निर्माण करण्यात आले. तर कार्यकारी मंडळाच्या आठ सदस्यांपैकी तीन सदस्य भारतीय घेण्याचे ठरले तर कायदे निर्मितीच्या विषयांचे विभाजन केंद्र व प्रांत यांच्यात करण्यात आले. उच्चशिक्षित भारतीयांना पहिल्यांच मतदानाचा हक्क देण्यात आला. तर प्रांतात दुहेरी शासन व्यवस्था लागू करण्यात आली.

9] 1935 चा भारत सरकार विषयक कायदा :-
भारतीय राज्यघटनेचा बहुतांश भाग 1935 च्या कायद्यावर आधारलेला आहे. राज्यघटनेचे अभ्यासक सुभाष कश्यब यांच्या मते भारतीय राज्यघटनेचा 75% भाग हा 1935 च्या कायद्यामधून आला आहे. या कायद्यात प्रामुख्याने केंद्र व राज्यसरकारचे च्या सूचिद्वारे अधिकार विभाजन प्रांतांमध्ये जबाबदार शासनपद्धती, समाजातील शोषित घटकांसाठी स्वतंत्र मतदार संघ अशा अनेक तरतुदी या कायद्यात करण्यात आल्या तसेच मतदानाच्या हक्काच्या विस्तार होऊन 10% लोकांना मतदानाचा हक्क देण्यात आला तर देशाच्या पतनियंत्रणासाठी रिजर्व बँकेची स्थापना करण्यात आली.

10] 1947 चा भारतीय स्वातंत्र्याचा कायदा :-
या कायद्यानुसार भारतातील स्वतंत्र राज्यघटना निर्माण करण्याचा अधिकार देण्यात आला. तसेच ती राज्यघटना भारतीयांसाठी लागू करण्याचा हक्क सुद्धा 1947 च्या कायद्यानुसार देण्यात आला.

ड] राज्यघटनेची निर्मिती :-

रचना - 1] 1947 च्या कायद्याने घटनानिर्मितीचा अधिकार मिळाल्यानंतर व जुलै 1946 मध्ये कॅबिनेट मिशनच्या शिफारशीनुसार घटनासमितीच्या निवडणूका झाल्या त्यानुसार घटनासमितीमध्ये एकूण 389 इतके सदस्य होते त्यापैकी काँग्रेसचे 212, मुस्लिमलिंगचे 73 इतर छोट्या पक्षाचे 11 व संस्थानाचे 93 प्रतिनिधी होते. 1947 मध्ये भारताची फाळणी झाल्यामुळे 3 जून 1947 मध्ये पाकिस्तानसाठी स्वतंत्र घटनासमिती स्थापन झाली. त्यामुळे भारतातल्या घटना समितीची संख्या कमी होऊन ती 299 इतकी झाली. 9 डिसेंबर 1946 ला घटना समितीचे पहिले अधिवेशन पार पडले. या अधिवेशनात हंगामी अध्यक्ष म्हणून डॉ सच्चिदानंद सिन्हा यांची निवड करण्यात आली. घटना समितीचे दूसरे अधिवेशन 11 डिसेंबर 1946 मध्ये भरले. त्यात डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी घटनासमितीचे पूर्ण वेळ अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

2] समित्या :-

भारतासाठी राज्य घटना निर्मितीसाठी निर्माण झालेल्या संविधान सभेने 22 समित्या नेमल्या त्यात 10 कार्यपद्धती विषयक व 12 विशिष्ट व्यवहार विषयक समित्या होत्या त्या पुढीलप्रमाणे :-

कार्यपद्धती विषयक समित्या :

1] सुकाणो समिती - डॉ. के एम मुळशी
2] कार्यपद्धती विषयक नियम समिती - डॉ राजेंद्र प्रसाद
3] गृहसमिती - डॉ. पट्टभीसीतारामय्या
4] वित्त समिती - डॉ. राजेंद्र प्रसाद
5] अधिकारपत्र समिती - डॉ. कृष्णास्वामी अय्यर
6] हिंदी भाषांतर समिती
7] उर्दु भाषांतर समिती
8] वृत्तपत्र व प्रेक्षागृहसमिती
9] 1947 च्या कायद्याच्या परिणाम कारकांची समिती
10] व्यापार समिती

विशिष्ट व्यवहारविषयक समित्या

1] मसुदा समिती - डॉ. बाबासाहेब आंबेडकर

2] वाटाघाटी समिती - डॉ. राजेंद्र प्रसाद

3] संघराज्य घटना समिती - डॉ. जवाहरलाल नेहरू

4] प्रांतिय राज्यघटना समिती - सरदार वल्लभभाई पटेल

5] मुलभूत हक्क व अल्पसंख्यांक समिती - सरदार वल्लभाई पटेल

6] केंद्र अधिकार समिती - डॉ. जवाहरलाल नेहरू

7] राष्ट्रध्वज समिती - डॉ. राजेंद्र प्रसाद

8] चिकित्सा समिती - सर कृष्णास्वामी अय्यर

9] सर्वोच्च न्यायालय समिती

10] वित्तीय तज्ञ समिती

11] भाषिकप्रांत समिती

12] मुख्य प्रशासक असलेल्या प्रांतासाठीची समिती

3] घटनानिर्मितीचे कामकाज :-

घटना निर्मितीसाठी निर्माण केलेल्या 22 समित्यांनी कामकाज सुरू केले त्यापैकी सर्वात महत्वाची म्हणून मसुदा समितीकडे पाहिले जाते. तिचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर मसुदा समितीची स्थापना 29 ऑगस्ट 1947 मध्ये झाली. घटनेच्या मसुद्यावर चर्चा व प्रस्ताव मांडले गेले. त्यात 7635 दुरूस्त्या सुचवण्यात आल्या परंतु त्यापैकी 2473 दुरूस्त्यावर चर्चा झाली. राज्यघटनेचे तीसरे वाचन 14 नोव्हेंबर 1949 मध्ये सुरु होऊन 26 नोव्हें 1949 रोजी ते संपले त्याच दिवशी आपले संविधान मंजूर व स्वीकृत करण्यात आले त्यावेळी घटना समितीच्या 299 प्रतिनिधीपैकी 284 प्रतिनिधीनी सह्या केल्या पुढे भारतीय राज्यघटनेची 26 जाने 1950 पासून अमलबजावणी सुरु झाली

4] घटना समितीच्या बैठका :-

घटना समितीच्या एकूण 11 बैठका झाल्या पहिली बैठक 9 डिसेंबर 1946 मध्ये तर शेवटची बैठक 14 ते 26 नोव्हें 1949 रोजी पार पाडली. घटना निर्मितीसाठी 2 वर्षे 11 महिने 18 दिवस लागले. एकूण कामकाज -165 दिवस चालले अशा पद्धतीने भारतीय संविधान निर्माण झाले.

प्र. २. भारतीय राज्यघटनेच्या सरनामा व त्यातील तत्वे विशद करा

प्रास्ताविक :- प्रत्येक राज्यघटनेमध्ये सरनामा हा त्या राज्यघटनेचे ध्येय उद्दिष्ट स्पष्ट करीत असतो त्याला प्रस्तावना, उद्देशिका किंवा उद्देशपत्रिका या नावानेही ओळखले जाते. भारतीय राज्यघटनेत सरनाम्याला महत्त्वाचे स्थान आहे त्याचे तत्वज्ञान पुढीलप्रमाणे आहे :-

ब] सरनाम्यातील उद्दिष्ट्ये :-
भारतीय राज्यव्यवस्थेने अनेक महानउद्दिष्ट्ये निश्चित केली आहेत. सरनाम्यात स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता, एकता अशया अनेक बाबींवर भर दिला.
1] न्याय :- सरनाम्यामध्ये राजकीय सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट्ये ठेवण्यात आले आहे. समाजातील विषमता, शोषण, भेदभाव, नष्ट करून सर्व व्यक्तिना सत्ता प्रतिष्ठा यांची हमी देणारी व्यवस्था निर्माण करणे म्हणजे न्याय होय. सामाजिक न्यायात समाजातील भेदभाव नष्ट करणे, आर्थिक न्यायात सर्वांना समान संधी देणे, दूर्बल घटकांना आर्थिक सवलती देणे तर राजकीय न्यायात राजकीय क्षेत्रात सहभागाची सर्वांना समान संधी देणे याचा समावेश होतो.

२] स्वातंत्र्य :-
सरनाम्यात स्वातंत्र्याच्या समावेश केला आहे. त्यात प्रत्येकाला विचार करण्याचे, अभिव्यक्त होण्याचे, श्रद्धा व उपासनेचे स्वातंत्र दिले आहे. हि स्वातंत्र्ये व्यक्तिला तिचा सर्वांगिण विकास करण्याचे आवश्यक आहे.

3] समानता :-
भारतीय सरनाम्यात समानतेच्या उद्देशाची मांडणी केली आहे. दर्जा व संधी या दोन बाबतीत समानता निर्माण करण्याचे उद्दिष्ट राज्यव्यवस्थेने ठेवले आहे. उदा., १८ वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक नागरिकास मतदानाचा हक्क दिला आहे तर सामाजिक समता निर्माण करण्यासाठी भेदभाव नष्ट करणारी, आर्थिक बाबतित विषमता दूर करून समता प्रस्थापित करणारी व्यवस्था निर्माण करणारी उद्दिष्टे ठेवली आहे.

ग) बंधुता एकता :-
भारत हा बहूभाषिक, बहूधार्मिक, बहूआंशिक समाज आहे त्यामुळे वेगवेगळ्या जातीधर्माचे लोक एकत्रित राहण्यासाठी बंधूभावाने राहण्यासाठी बंधुता व एकता हे तत्व स्विकारले भारताची फाळणी होऊन दोन तुकडे झाले अशा गोष्टी होऊ नयेत म्हणून राष्ट्रीय ऐक्य एकता व एकात्मता यावर भर दिला

क] भारतीय सरनाम्यातील तत्वे :-
भारतीय सरनाम्याचे विश्लेषण करताना सरनाम्याचे स्त्रोत, तत्वे व त्याचे स्वरूप समजून घेणे महत्त्वाचे ठरते.
1] अधिसत्तेचा स्त्रोत :-
सरनाम्यातील आम्ही भारतीय लोग या वाक्यावरून असे स्पष्ट होते की देशातील जनता हा आदिसत्तेचा अंतिम स्त्रोत आहे.
2] भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याचे तत्व :-
भारतीय संविधानाच्या सरनाम्यात सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य अशी तत्वे दिली आहेत. या तत्वांच्या माध्यमातून आपणास भारतीय राज्यघटनेचे स्वरूप समजून येत हि तत्वे पूढीलप्रमाणे :-

* सार्वभौम :- भारत हा स्वातंत्र व सार्वभौम देश आहे त्यावर दूसऱ्या कोणत्याही देशाचे वर्चस्व नाही. तो अंतर्गत व बहिर्गत सार्वभौम आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर इतर देशांप्रमाणेच त्याला समान दर्जा आहे.

धर्मनिरपेक्ष :-
भारतीय सरनाम्यात धर्मनिरपेक्ष हा शब्द 1976 मध्ये 42 व्या घटना दूरूस्तीने समाविष्ट केला. त्यानूसार भारत हा सर्वधर्म समान असतील कोणताही धर्म श्रेष्ठ किंवा कनिष्ठ असणार नाही. प्रत्येकाला आपल्या मर्जीप्रमाणे जीवन जगण्याचा आपल्या धर्माचा प्रचार करण्याचा, प्रसार करण्याचा, त्याप्रमाणे आचरण करण्याचे स्वातंत्र्य असेल

लोकशाही :-

भारतीय संविधानाने प्रातिनिधीक व संसदिय लोकशाहीचा स्विकार केला आहे. लोकशाहीचे तत्व स्विकारून जनता व त्यांचे प्रतिनिधी यांच्यात जबाबदारीचे नाते निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. लोकांनी स्वमताने प्रतिनिधी निवडणे व प्रतिनिधींनी जनतेचे हित जोपासणे अशी लोकशाही निर्माण करण्यावर भर दिला आहे.

गणराज्य :-

गणराज्य म्हणजे ज्या देशात राष्ट्रप्रमुख हा वंशपरंपरेने येत नसून निवडणूकीच्या माध्यमातून त्याची निवड केली जाते. राजशाहीच्या विरोधी गणराज्य पद्धती आहेत. भारतातील राजशाही नष्ट करून लोकशाही निर्माण करण्यासाठी गणराज्य पद्धतीची संकल्पना स्वीकारली.

ड] भारतीय सरनाम्याचे तत्वज्ञान :-

भारतीय संविधानात व सरनाम्यात विविध कायदे, मूलभूत हक्क, शासनसंस्थेची रचना, सत्ताविभाजन अशा अनेक तत्वांची तरतूद आहे. हि सर्व आदर्श तत्वे पूर्ण करून ठेवण्यासाठी सरनाम्याचे तत्वज्ञान महत्वाचे आहे. घटनेतील विविध तरतूदीमुळे सरनाम्यातील उद्देश पूर्ण होतात. सरनाम्यात उदारमतवाद, भांडवलवाद, साम्यवाद व गांधीवाद अशा प्रमुख विचार सरणीचा सुवर्ण मध्य साधला आहे. अशा पद्धतीने सरनाम्याचे तत्वज्ञान विवेचन करता येते.

भारतीय राज्यघटनेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा

अ] प्रस्तावना :-

भारतीय संविधान सभेने २६ नोवें १९४९ रोजी आपले संविधान स्वीकृत व अधिनियमित केले. संविधानाचा अंमल २६ जाने १९५० पासून सुरु झाला. त्यावेळी संविधानात २५ भाग, ८ परिशिष्टे व ३९५ कलमे होते. भारतीय संविधान निर्मितीमध्ये 22 समित्यां बरोबर मसुदा समितीने महत्त्वाची भूमिका पार पाडली म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हटले जाते. भारतीय संविधानावर ब्रिटिश कालीन कायदे, उदारमतवाद, समाजवाद, भांडवलवाद अशा विविध विचारसरणींचा प्रभाव वाढला. जगातील अनेक देशातून राज्यव्यवहारांसाठी आवश्यक व चांगली तत्वे आपण स्वीकारली त्यातून भारतीय संविधान निर्माण झाले.

ब] भारतीय संविधानाचे स्वरूप :-

भारतीय संविधानाचे स्वरूप

1] उदारमतवादी लोकशाही :-

कायद्याचे राज्य प्रातिनिधीक शासन प्रौढ, मताधिकार व सार्वत्रिक मतदान, नागरिकांचे मूलभूत हक्क व स्वातंत्र न्याय मंडळ अशा विविध उदारतवादी तत्वांची मांडणी राज्यघटनेत केली आहे.

२] धर्मनिरपेक्षता :-

भारतात अनेक जातीधर्मांचे लोक राहतात त्यातून देशाची फाळणी, जातीय दंगली, निर्माण होत आहेत त्यावर उपाय म्हणून वेगवेगळ्या जाती धर्मात सलोखा व शांतता निर्माण करण्यासाठी राज्यघटनेत ने धर्मनिरपेक्षतेची तरतूद करण्यात आली आहे.

३] संघराज्य :-

भारतीय राज्यघटना लिखित स्वरूपाची असून सत्तेचे वाटप, स्वतंत्र न्यायमंडळ अशी संघराज्याची वैशिष्ट्ये तिच्यात आढळतात तर काही विचारवंतांच्या ईथे

भारत हे संघराज्य हे अर्धसंघराज्य आहे.

क] भारतीय राज्यघटनेची वैशिष्ट्ये :-

1] लिखीत किंवा विस्तृत राज्यघटना :-
भारतीय राज्यघटना तिच्यातील सर्व तरतुदी नमूद केल्या आहेत. उदा. अधिकार सत्तेचे विभाजन, मूलभूत हक्क, आणीबाणीची तरतूद, या सर्वांमुळे घटनेची व्याप्ती वाढत गेली आहे. घटना निर्मितीवेळी 395 कलमे, 25 भाग, 8 परिशिष्टे होती. सध्या 460 कलमे, 28 भाग व 12 परिशिष्टे समाविष्ट आहेत. त्यामुळे भारतीय संविधान विस्तृत बनले आहे.

2] ताठर व लवचिक राज्यघटना :-
राज्यघटनेच्या कलम 36 नुसार घटनेमध्ये दुरुस्त्या करताना 3 पद्धती सांगितल्या आहेत. त्या म्हणजे साधे बहुमत, विशेष बहुमत, विशेष बहुमत व निम्म्यापेक्षा अधिक घटक राज्यांच्या विधीमंडळाच्या मान्यता अशा 3 प्रकारे घटनेत बदल करता येतो. साध्या बहुमताने बदल करणे सोपे आहे. त्यामुळे राज्यघटना लवचिक किंवा परिवर्तनीय वाटते. तर विशेष बहुमत व निम्म्यापेक्षा अधिक घटक राज्यांची मंजुरी होणे व घटनेत बदल करणे खूप ताठर आहे. म्हणजे राज्यघटना परिदृढ वाटते.

3] जनतेचे सार्वभौमत्व :-
भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याची सुरुवात 'We the people of India' म्हणजे 'आम्ही भारतीय लोक' अशी केली आहे म्हणजे सत्तेचा अंतिम स्रोत जनता आहे. भारतीय सर्व नागरिक बाह्यनियंत्रणापासून मुक्त आहेत. जनता सर्वश्रेष्ठ आहे.

4] संसदीय लोकशाही :-
भारतीय राज्यघटनेत संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला आहे. म्हणजे भारताचा राज्यकारभार जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींच्या मिळून बनलेल्या संसदेकडून चालेल. राष्ट्रपती, पंतप्रधान व त्यांचे मंत्रीमंडळ संसद चालवतील लोकहिताचे कायदे तयार करणे, व त्यांची अमलबजावणी करतील.

५] गणराज्य :-

गणराज्य म्हणजे देशाचे सर्वोच्च पद हे वंशपरंपरेने न निवडता निवडणुकीच्या माध्यमातून निवडले जाते किंवा राजा नसलेले राज्य म्हणजे गणराज्य होय.

६] संघराज्य :-

भारतीय राज्यघटनेमध्ये कलम १ मध्ये भारत हा राज्यांचा संघ आहे असे स्पष्ट केले आहे. अधिकार सत्तेची विभागणी स्वतंत्र न्यायालयाची व्यवस्थेची तरतूद या संघराज्याच्या वैशिष्ट्यामुळे भारताला संघराज्य असे म्हटले जाते. के. सी. व्हिअर यांनी भारतीय संघराज्याला अर्धसंघराज्य असे म्हटले. भारतात केंद्रसूची, राज्यसूची, व समवर्ती सूची याद्वारे अधिकाराची विभागणी केली आहे.

७] स्वतंत्र न्यायमंडळ :-

भारतीय राज्यघटनेमध्ये स्वतंत्र न्यायव्यवस्थेची तरतूद केलेली आहे. देशात एकेरी न्यायव्यवस्था स्वीकारली आहे. घटनेने न्यायालयीन पुर्नविलोकनाचा हक्क दिलेला आहे. प्रत्येक नागरिकास आपल्या मुलभूत हक्कावर आक्रमण झाल्यास न्याय मागण्यासाठी न्यायालयाची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार सर्वोच्च → उच्च → जिल्हा न्यायालय अशी यंत्रणा प्रस्थापित केलेली आहे.

८] सार्वत्रिक प्रौढ मतदान :-

भारतामध्ये लोकशाहीच्या आधार म्हणून निवडणुकाकडे पाहिले जाते. राज्यघटनेनुसार १९८८ पर्यंत २१ वय वर्षे पूर्ण असलेल्या सर्व भारतीय नागरिकांस मतदानाचा हक्क दिलेला होता. १९८८ मध्ये ६१ वी घटना दुरूस्ती होऊन मतदानाचा हक्क वयवर्ष १८ पूर्ण करणाऱ्या सर्व नागरिकांस दिला आहे. थोडक्यात भारतात प्रौढ मतदान पद्धतीचा स्वीकार केला आहे. मतदानाचा हक्क देताना धर्म, जात, वंश, प्रदेश, लिंग, यावरून कोणताही भेदभाव केला जात नाही.

9] स्वतंत्र संस्था :-
भारतामध्ये विशिष्ट कार्ये पार पाडण्यासाठी विशिष्ट संस्थाची स्थापना करण्यात आली आहे. → निवडणूक आयोग

स्वतंत्र व भयमुक्त निवडणूका पार पाडण्यासाठी निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली → महालेखा प्रबंधक

केंद्र व राज्यसरकारच्या आर्थिक खर्चाची, व्यवहाराची तपासणी किंवा परिक्षण करण्यासाठी, फुकीच्या खर्चाला पायबंद घालण्यासाठी महालेखा प्रबंधकाची स्थापना करण्यात आली आहे. → केंद्रीय लोकसेवा आयोग

भारतात प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांची निवड करण्यासाठी केंद्रीय लोकसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. हा आयोग निपक्षपातीपणे अधिकाऱ्यांची निवड करतो.

10] मूलभूत हक्क :-
भारतीय राज्यघटनेत कलम 12 ते 35 मध्ये मूलभूत हक्काची तरतूद केलेली आहे. नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी मूलभूत हक्क दिलेले आहेत.

11] राज्याची मार्गदर्शक तत्वे :-
घटनेच्या चौथ्या भागात कलम 36 ते 51 मध्ये समाविष्ट केलेली राज्याची मार्गदर्शक तत्वे हि वैशिष्ट्ये पूर्ण आहे. कारण सामाजिक व आर्थिक लोकशाही निर्माण करण्यासाठी हि तत्वे महत्वाची भूमिका पार पाडतात. या विरोधात न्यायालयात जाता येत नाही.

12] एकेरी नागरिकत्व :-
भारतीय राज्यघटनेच्या दुसऱ्या भागात कलम 5 ते 11 मध्ये नागरिकत्वाची तरतूद केलेली आहे त्या नुसार सर्व भारतीयांना फक्त भारताचे नागरिक असे संबोधले जाईल म्हणजे घटनेने देशाचे एकेरी नागरिकत्व स्वीकारले आहे.

[3] मूलभूत कर्तव्ये :-

भारतीय राज्यघटनेत 42 व्या घटना दुरुस्तीने 1976 मध्ये भाग 4 अ, कलम 51 अ या तरतुदी अंतर्गत मूलभूत कर्तव्यांचा समावेश करण्यात आला. घटनेने हि कर्तव्ये भारतीय नागरिकांसाठी दिली आहेत. सध्या 11 मूलभूत कर्तव्ये आहे.

[4] आणीबाणीच्या तरतुदी :-

भारतीय राज्यघटनेमध्ये असामान्य परिस्थिती हाताळण्यासाठी आणीबाणीची तरतूद करण्यात आली आहे. भारताचे सार्वभौमत्त्व एकता व सुरक्षितता ठेवण्यासाठी कलम 352 नुसार राष्ट्रीय आणीबाणी, राज्यातील राजकीय पेचप्रसंग सोडवण्यासाठी कलम 356 नुसार व देशातील अर्थव्यवहार हाताळण्यासाठी कलम 360 नुसार आर्थिक आणीबाणी लागू करता येते.

[5] राज्यघटनेचे विविध स्रोत :-

भारतीय राज्यघटना ब्रिटिश कालीन कायदे, विविध विचारसरणी व तत्त्वज्ञानातून आणि विविध देशाच्या राज्यघटनेतील चांगल्या तत्त्वाच्या अनुकरणातून निर्माण झाले आहे. भारतीय राज्यघटनेने इंग्लंडकडून कायद्याचे राज्य, अमेरिकेकडून मूलभूत हक्क, रशियाकडून मूलभूत कर्तव्ये अशा चांगल्या तरतुदी घेतल्या

Date 16 08 22

प्रकरण 2 - मूलभूत हक्क (कलम १५ ते १७)

M = 10

प्रश्न १ मूलभूत हक्क म्हणजे काय ते सांगून हक्काचे स्वरूप व प्रकार विषद करा

अ] प्रस्तावना :-

प्रत्येक नागरिकाला स्वतःचा विकास करण्यासाठी व स्वातंत्र्य उपभोगण्यासाठी राज्याने पुरविलेले हक्क म्हणजे मूलभूत हक्क होय. व्यक्तीच्या मूलभूत हक्कासाठी राज्याकडून पोषक वातावरण निर्माण केले जाते त्यालाच मूलभूत हक्क असे म्हणतात. लास्की यांच्यामते, माणसाला आपल्या आयुष्यात सर्वोच्च टप्प्यापर्यंत पोहचता येईल अशी सामाजिक जीवनाची परिस्थिती म्हणजे हक्क होय.

ब] हक्काचा अर्थ :-

मूलभूत हक्क म्हणजे व्यक्तीस्वतंत्र्यासाठी आवश्यक बाबींना राज्याने दिलेला पाठिंबा होय. बहुतेक देशातील नागरिकांना संघर्षानंतर हक्क मिळाले आहेत. राज्यघटना हा मूलभूत हक्काचा स्रोत आहे. कोणालाही बेकायदेशीर रित्या हक्कावर बंधने आणता येणार नाही. यावरून असे म्हणता येते की, राज्यघटनेमध्ये नमूद असलेले, न्यायालयीन संरक्षण मिळालेले, व्यक्तीच्या सार्वजनिक व खाजगी जिवनासाठी अत्यावश्यक असलेले कायदे म्हणजे मूलभूत हक्क होय.

क] मूलभूत हक्काचे स्वरूप :-

विविध देशांच्या राज्यघटनेमध्ये मूलभूत हक्काचे स्वरूप स्पष्ट केले आहे भारतीय राज्यघटनेतसुद्धा मूलभूत हक्काचे स्वरूप स्पष्ट केले आहे.

1] अंमलबजावणी बंधनकारक :-

भारतीय राज्यघटनेच्या कलम १२ मध्ये अशी तरतूद केली आहे की, शासनाने मूलभूत हक्काची अंमलबजावणी करावी.

2] मूलभूत हक्कांना संरक्षण :-

भारतीय राज्यघटनेच्या कलम १३ नुसार दोन प्रकारचे संरक्षण दिले आहे.

ते म्हणजे स्वातंत्र्यापूर्वी केलेले कायदे स्वातंत्र्योत्तर काळातील कायद्याशी विसंगत असतील तर त्याची अंमलबजावणी करू नये. तसेच राज्य सरकार किंवा केंद्र सरकार मूलभूत हक्कांची गळचेपी होईल असे कायदे करणार नाही.

ब] संरक्षणाची हमी :-
भारतीय राज्यघटनेने दिलेल्या मूलभूत हक्कांच्या संरक्षणाची हमी दिलेली आहे. घटनेच्या कलम 32 मध्ये 5 प्रकारच्या घटनात्मक उपायाच्या तरतूद केलेली आहे. या 5 ही प्रकारच्या तरतुदी मूलभूत हक्कांचे संरक्षण करतात.

ड] मूलभूत हक्कांचे प्रकार :-
सर्वसाधारणपणे मूलभूत हक्क हे सामाजिक, आर्थिक, राजकीय कायदेशीर व नैतिक प्रकारचे असतात. भारतीय राज्यघटनेमध्ये कलम 14 ते 35 मध्ये मूलभूत हक्क दिलेले आहेत. त्याचे कलम 14 ते 18 - समतेचा हक्क, कलम 19 ते 22 - स्वातंत्र्याचा हक्क, कलम 23 ते 24 - पिळवणूक विरोधी हक्क, कलम 25 ते 28 - धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क, कलम 29 ते 30 - सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क, कलम 32 - घटनात्मक उपाययोजनेचा हक्क अशा 6 प्रकारात वर्गिकरण करता येते.

१] समतेचा हक्क :-
भारतीय राज्यघटनेत कलम 14 ते 18 मध्ये समतेच्या हक्काची तरतूद केली आहे. त्यातील तपशील पुढीलप्रमाणे आहे.

1] कलम 14 - कायद्यापुढे समानता :-
घटनेच्या कलम 14 नुसार भारतात राहणारी प्रत्येक व्यक्ती कायद्या-समोर, समान मानली जाईल. धर्म, वंश, जात, लिंग, प्रदेश अश्या कोणत्याही प्रकारच्या व्यक्तीव्यक्तीमध्ये फरक केला जाणार नाही. सर्वांना कायद्याचे समान संरक्षण दिले जाईल. कायद्यासमोर कोणीही श्रेष्ठ किंवा कनिष्ठ असणार नाही. सर्वजण कायद्यासमोर समान असतील परंतु परकीय नागरिकांना हा हक्क उपभोगता

येणार नाही.

२] कलम 15 - भेदभावाचा अभाव :-

कलम 15 नुसार भारतात धर्म, वंश, जात, लिंग, प्रदेश यानुसार सार्वजनिक ठिकाणी प्रवेश देताना भेदभाव केला जाणार नाही. सरकारच्या सार्वजनिक सोयी उदा., सार्वजनिक दुकाने, मनोरंजनाचे ठिकाणे, दवाखाने, वाहतूक व्यवस्था या ठिकाणी नागरिकांमध्ये प्रवेश देताना कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जाणार नाही.

३] कलम 16 - समान संधी.

भारतात सार्वजनिक सेवेमध्ये भरती होण्यासाठी समतेच्या तत्वाने सर्वांना समान संधी दिली जाईल. सार्वजनिक सेवेतील प्रवेशावेळी भारतीय नागरिकांमध्ये जात, धर्म, वंश, प्रदेश, जन्मस्थळ अशा कोणत्याही कारणावरून भेदभाव केला जाणार नाही.

४] कलम 17 - अस्पृश्यता निवारण

घटनेच्या कलम 17 नुसार भारतात अश्यपृश्यता पाळणे हा कायद्याने गुन्हा आहे. भारतात पूर्वी जाती व धर्मांमध्ये, कुळांमध्ये श्रेष्ठ किंवा कनिष्ठ अशी स्तररचना निर्माण झाली होती. ही संपवून सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी भारतात 1955 मध्ये अश्यपृश्यता निवारण कायदा करण्यात आला.

५] कलम 18 - पदव्यांची समाप्ती.

स्वातंत्र्यापूर्वी भारतात, रावसाहेब, खानसाहेब, रावबहादूर अश्या पदव्या दिल्या जात होत्या. त्यामुळे नागरिकांमध्ये भेदाभेद केला जात होता. घटनेने कलम 18 नुसार समाजात भेदभाव करणाऱ्या पदव्यांची समाप्ती केली. अपवाद म्हणजे लष्करी सेवेमध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्यानंतर त्यांना सन्मानीत करण्यासाठी पदव्या देण्याची तरतूद ठेवली आहे.

Date

४] स्वातंत्र्याचा हक्क

कलम १९ ते २२ -

भारतीय राज्यघटनेत १९ ते २२ मध्ये स्वातंत्र्याचा हक्क दिलेला आहे.

1] कलम १९ - स्वातंत्र्याचा हक्क :-

कलम १९ मध्ये भारतीय नागरिकांना ~~समान~~ सहा प्रकारची स्वातंत्र्य दिली आहेत → भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य → विनाशस्त्र एकत्र येण्याचे स्वतंत्र्य → संस्था किंवा संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य → भारतात कोठेही संचार करण्याचे स्वातंत्र्य → भारतात कोठेही वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य → कोणताही उद्योग, व्यवसाय, व्यापार करण्याचे स्वातंत्र्य

अशा प्रकारची सहा स्वातंत्र्य कलम १९ नुसार घटनेने भारतीय नागरिकांना दिली आहेत.

२] कलम २० - दोषसिद्धी पासून संरक्षण

कलम २० नुसार प्रत्येक नागरिकास सन्मानाने जीवन जगण्याचा हक्क आहे. कलम २० नुसार ज्या व्यक्तीवर गुन्हेगार म्हणून आरोप केलेला आहे अशा आरोपीस आपली बाजू मांडण्याचा हक्क आहे. तसेच एकाच गुन्ह्यासाठी कोणत्याही व्यक्तीला दोन वेळा शिक्षा दिली जाणार नाही

३] कलम २१ - जीविताच्या स्वातंत्र्याचा हक्क.

कलम २१ नुसार प्रत्येक व्यक्तीला व्यक्तीगत जीवनाचे संरक्षण करण्याचे स्वातंत्र्य आहे. कोणत्याही व्यक्तीपासून जीविताचे स्वातंत्र्य हिरावून घेतले जाणार नाही. या कलमानुसार व्यक्तीला उदर निर्वाहाचा हक्क, शिक्षणाचा हक्क, आरोग्याचा हक्क असे अनेक हक्क प्राप्त होतात.

४] कलम २१ क - शिक्षणाचा हक्क

८६ व्या घटनादुरुस्तीनुसार २००२ मध्ये कलम २१ क शिक्षणाचा हक्क समाविष्ट करण्यात आला त्यानुसार भारतातील ६ ते १४ वयोगटातील सर्व मुला मुलींना मोफत व सक्तीच्या शिक्षणाची तरतूद केली आहे.

५] कलम २२ - अटकेपासून संरक्षण

कलम २२ नुसार कोणत्याही नागरिकांस अटक करण्यापूर्वी अटकेची कारणे

सांगावी लागतात तसेच अटक केल्यापासून २४ तासांच्या आत संबंधित व्यक्तीला न्यायालयाच्या समोर हजर करावे लागते. अशा पद्धतीने या कलमात भारतीय नागरिकांना अटकेपासून संरक्षण दिले आहे.

सारांश :-

भारतीय राज्यघटनेच्या कलम १४ ते १८ मध्ये दिलेल्या समतेच्या हक्कामुळे समाजात सामाजिक, आर्थिक समता निर्माण होते. सार्वजनिक सेवेच्या प्रवेशात व उपभोगात सर्वांना समान संधी मिळते. तर घटनेच्या कलम १९ ते २२ नुसार भारतीय नागरिकांना व्यक्तीगत जीवन जगण्यासाठी विविध प्रकारची स्वातंत्र्य बहाल करण्यात आली आहेत त्यामुळे भारतीय नागरिकांच्या दर्जात सुधारणा झाली आहे.

प्रश्न २. भारतीय संविधानाने दिलेला पिळवणूक विरोधी हक्क स्पष्ट करा. किंवा भारतातील शोषणविरोधी हक्काची तरतूद विशद करा.

प्रास्ताविक :

भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या भागात कलम १२ ते ३५ मध्ये मूलभूत हक्क दिलेले आहेत. त्यामध्ये कलम २३ व २४ मध्ये पिळवणूक विरोधी किंवा शोषण विरोधी हक्क दिलेले आहेत.

ब] शोषणविरोधी हक्क :-

भारतीय राज्यघटनेच्या कलम २३ व २४ मध्ये दोन प्रकारचे शोषणविरोधी हक्क दिले आहेत ते पुढीलप्रमाणे

१] कलम २३. माणसांचा अपव्यापार व वेठबिगारी पद्धतीस मनाई :-

कलम २३ नुसार भारतीय नागरिकास माणसांचा अपव्यापार करता येणार नाही. तसेच त्यांच्याकडून वेठबिगार म्हणून काम करून घेतले जाणार नाही. जर असे कृत्य घडले तर तो कायद्याने गुन्हा मानला जाईल. थोडक्यात कोणत्याही व्यक्तीला त्याच्या इच्छेविरुद्ध मोबदला न देता कामावर ठेवला येणार नाही.

कलम २४ - बालकामगार मनाई :-
घटनेच्या कलम २४ नुसार वय वर्ष ६ ते १४ वयोगटातील मुलांना कोळसाच्या खाणी, अवजड उद्योगधंदे किंवा इतरधोक्याच्या ठिकाणी कामावर ठेवता येणार नाही. अशा मुलांना कामावर ठेवणे हा कायद्याने गुन्हा मानला जाईल. या कलमान्वये ६ ते १४ वयोगटातील बालकांना पिळवणूक विरोधी स्वातंत्र्याचा हक्क बहाल करण्यात आला आहे.

क] सारांश :-
भारतीय राज्यघटनेच्या कलम २३ व २४ नुसार दिलेला शोषणविरोधी हक्क सर्व नागरिकांना सामाजिक समतेकडे घेऊन जाणारा आहे. कलम २३ नुसार देहविक्रीसारख्या समाजातील वाईट प्रथा बंद करण्यासाठी महत्त्वाचा ठरत आहे. तर कलम २४ नुसार दिलेल्या हक्कांमुळे ६ ते १४ वयोगटातील बालकांना सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरत आहे

प्रश्न भारतीय संविधातील धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क विशद करा
अ] प्रास्ताविक :-
भारतीय राज्यघटनेने धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व स्वीकारले आहे तर धर्मनिरपेक्ष राज्य निर्माण करण्याच्या उद्दिष्टाने कलम २५ ते २८ मध्ये धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क भारतीय नागरिकांना दिला आहे.

ब] धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क कलम 25 ते 27
1] कलम 25 - धर्म निवडीचे स्वातंत्र्य
कलम 25 नुसार प्रत्येक भारतीय नागरिकास त्याच्या मर्जीप्रमाणे धर्म निवडण्याचे स्वातंत्र्य आहे तसेच निवडलेल्या धर्माचे आचरण करण्याचे, धर्माच्या प्रचार व प्रसार करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. कोणत्याही धर्मामध्ये भेदभाव न करता नागरिकास आपले धार्मिक स्वातंत्र्य जोपासता येते.

2] कलम 26 - धार्मिक संस्था स्थापन करण्याचे स्वातंत्र्य
घटनेच्या कलम 26 नुसार भारतीय नागरिकांना आपल्या धर्माचा प्रचार

व प्रसार करण्यासाठी धार्मिक संस्था स्थापन करण्याचा हक्क दिला आहे. अशा स्थापन केलेल्या संस्थांचे सर्व व्यवहार, त्यासंदर्भातील जमा झालेली मालमत्ता यांचे कायद्यानुसार व्यवस्थापन करण्याचे स्वातंत्र्य प्रत्येक नागरिकांस दिले आहे.

३] कलम 27 - धार्मिक बाबींसाठी देणगी देण्याचे स्वातंत्र्य.

कलम 27 नुसार नागरिकांना धर्माच्या संवर्धनासाठी देणगी गोळा करण्याचे स्वातंत्र्य आहे. परंतु अशी वर्गणी गोळा करताना कोणालाही सक्ती करता येणार नाही. ~~भारतीय~~ धार्मिक वर्गणी देण्यासाठी प्रत्येक व्यक्ती स्वातंत्र्य आहे.

४] कलम 28 - शिक्षणसंस्थामध्ये धार्मिक शिक्षण.

घटनेच्या कलम 28 मध्ये अशी तरतूद केली आहे की ज्या शिक्षण संस्थाना केंद्र किंवा राज्यसरकारकडून अनुदान मिळते. त्यामधून धार्मिक शिक्षण देता येणार नाही. तर धार्मिक संस्थामधून धार्मिक शिक्षण देता येईल. परंतु धार्मिक शिक्षण घेण्याची कोणावरही सक्ती केली जाणार नाही.

क] सारांश

भारतीय राज्यघटनेच्या कलम 25 ते 28 मध्ये दिलेले धार्मिक स्वातंत्र्याचे हक्क नागरिकांना धार्मिक आचरणाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. धार्मिक संस्थानी व शिक्षणसंस्थानी कशा पध्दतीने शिक्षण दयायचे आहे?, घटनेच्या धार्मिक स्वातंत्र्याला अधिन राहून धर्मनिरपेक्ष राज्य निर्माण करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करणे अशा विविध बाबीसाठी धार्मिक हक्क महत्त्वाचे ठरतात.

सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क :

प्रस्तावना :-

प्रत्येक समाजव्यवस्था हि वेगळ्या स्वरूपाची असते. भारतीय समाजव्यवस्था सुद्धा अनेक धर्म, अनेक जाती, अनेक वंश, अनेक भाषा, अनेक संस्कृती यांचा अनोखा संगम आहे. लोकशाहीमध्ये बहूसंख्याक अल्पसंख्याकावर वर्चस्व निर्माण करतात. परंतु भारतात तसे न होता अल्पसंख्याकांचे विविध हक्क जोपासले जातात.

सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क :-

भारतीय राज्यघटनेच्या कलम 29 ते 30 मध्ये सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क दिले आहेत. ते पुढीलप्रमाणे :-

1] कलम 29 :- अल्पसंख्याकांचे संरक्षण :-

घटनेच्या कलम 29 नुसार प्रत्येक भारतीय नागरिकास आपली स्वतःची भाषा, लिपी व संस्कृती जोपासण्याचा हक्क आहे. राज्याकडून अनुदान दिलेल्या शिक्षण संस्थामध्ये प्रवेश देताना अल्पसंख्याकांमध्ये भेदभाव केला जाणार नाही. धर्म, वंश, भाषा, लिपी, संस्कृती यांवरून भेदभाव केला जाणार नाही.

2] कलम 30 - शैक्षणिक हक्क :-

घटनेच्या कलम 30 नुसार अल्पसंख्यांकाना धर्म व भाषेच्या आधारावर शिक्षण संस्था स्थापन करता येतील त्यानुसार अल्पसंख्याकांना त्या शिक्षण संस्थामधून शिक्षण देता येईल. अशा वेळी कोणत्याही भेदभाव केला जाणार नाही.

सारांश

भारतीय राज्यघटनेने प्रत्येक नागरिकास कलम 29 ते 30 नुसार दिलेले सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क धर्म, भाषा, लिपी, संस्कृती संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. भारतातील अल्पसंख्याकांना या हक्कांमुळे आपली संस्कृती जोपासता येते. शैक्षणिक विकास करता येतो.

प्रश्न घटनात्मक उपाययोजनेचा हक्क विशद करा? किंवा
भारतीय संविधानातील संविधानिक उपायाचा हक्क स्पष्ट करा.

अ] प्रास्ताविक :-

भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या भागात कलम 12 ते 35 मध्ये 6 प्रकारचे मूलभूत हक्क दिलेले आहेत. तर समतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, शोषणविरोधी हक्क, सां धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क व सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क हे हक्क कलम 14 ते 30 मध्ये दिलेले आहेत. त्या हक्कांवर जर आक्रमण झाले तर न्यायालयात दाद मागण्यासाठी घटनेच्या कलम 32 ते 35 मध्ये घटनात्मक उपाययोजनेचा हक्क दिलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या हक्काविषयी असे म्हणतात की, "घटनात्मक उपाययोजनेचा हक्क हा संविधानाचा आत्मा किंवा प्राण आहे." पुढे ते असेही म्हणतात की जर मूलभूत हक्कांना संरक्षण नसेल तर ते मूल्यहीन ठरतील.

ब] घटनात्मक उपाययोजनेचा हक्क

कलम 32 नुसार मूलभूत हक्कांच्या संरक्षणाची हमी देण्यात आली आहे. मूलभूत हक्कावर आक्रमण झाल्यास सर्वोच्च न्यायालय अंतिम न्याय देईल. संसदेचे विविध कायदे व त्याच्या अर्थ लावण्याचे काम न्यायालय करेल. व्यक्तीच्या मूलभूत हक्कावर आक्रमण झाल्यास न्यायालयाकडून विविध आदेश देण्यात येतील. त्या आदेशामधून नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण केले जाईल.

1] बंदी प्रत्यक्षीकरण :-

कलम 32 नुसार एखाद्या व्यक्तीला पोलिसांनी बेकायदेशीर रित्या ~~पो~~ अटक केली असेल तर त्या व्यक्तीला 24 तासांच्या आत हजर करावे लागते. याला बंदी प्रत्यक्षीकरण असे म्हणतात. अटक केलेली व्यक्ती. न्यायालयाकडे घटनात्मक रित्या अर्ज करू शकते. न्यायालय असा आदेश देते की अटक केलेल्या व्यक्तीला प्रत्यक्ष शरीराने हजर करा. जर ती व्यक्ती निरअपराध असेल तर न्यायालय त्याला सोडून देते.

2] परमादेश :-

जर एखादी व्यक्ती / अधिकारी / संस्था / सरकार जर आपले कायदेशीर कर्तव्य

पार पाडत नसेल तर त्यामुळे कोणाच्या मूलभूत हक्कामुळे अन्याय झाला असेल तर ती व्यक्ती न्यायालयाकडे अर्ज करते. न्यायालय त्या अर्जावर तपासणी करून संबंधित अधिकारी, संस्था किंवा सरकारला कर्तव्य पालनाच्या आदेश देते त्याला परमादेश असे म्हणतात.

3) प्रतिषेध :-
प्रतिषेध म्हणजे जर एखादा खटला कनिष्ठ न्यायालयात सुरू असेल परंतु तो चालवण्याचा अधिकार त्यांना नसेल व तो चालवण्यामुळे कोणाच्या हक्कांवर बंधने येत असतील तर संबंधित व्यक्ती न्यायालयाकडे अर्ज करते, न्यायालय त्या अर्जाचा विचार करून तपासणी करून संबंधित खटला थांबविण्याचे आदेश देते त्याला प्रतिषेध असे म्हणतात.

4) अधिकारपृच्छा
जर एखाद्या शासकीय पदावरील व्यक्ती तिचे अधिकार नसताना जर वापरत असेल किंवा पात्र नसताना एखादे पद भूषवत असेल आणि त्यामुळे जर कोणाच्या मूलभूत हक्काची गळचेपी होत असेल तर संबंधित व्यक्ती न्यायालयाकडे अर्ज करू शकते. न्यायालय त्या अर्जाची तपासणी करताना संबंधित अधिकाऱ्याला तुम्ही कोणत्या कायद्यानुसार या पदावर काम करत आहात. अशी विचारणा करते त्याला अधिकारपृच्छा असे म्हणतात.

5) उत्प्रेक्षण :-
जेव्हा एखादा खटला चालवण्याचा अधिकार कनिष्ठ न्यायालयाला नसताना देखील जर तो सुरू असेल तर त्यामुळे त्या व्यक्तीवर अन्याय होत आहे अशी व्यक्ती वरिष्ठ न्यायालयाकडे अर्जदाखल करते. वरिष्ठ न्यायालय या अर्जाची शहानिशा करून संबंधित खटल्याचे कामकाज बंद करून त्याविषयीची सर्व कागदपत्रे व साक्षीपुरावे वरिष्ठ न्यायालयाकडे वर्ग करण्याचा आदेश देते त्याला उत्प्रेक्षण असे म्हणतात.

अशा पध्दतीने मूलभूत हक्कांवर जर आक्रमण झाले तर न्यायालय बंदीप्रत्यक्षीकरण, परमादेश, प्रतिषेध, अधिकारपृच्छा व उत्प्रेक्षण असे पाच प्रकारचे आदेश काढते.

क) मूलभूत हक्कांबाबत पूरक तरतुदी :-
घटनेच्या कलम 33 ते 35 मध्ये मूलभूत हक्कांसाठी पूरक तरतुदी केल्या आहेत.

1] कलम 33 - मूलभूत हक्क, सेनादलाना लागू करताना :-
घटनेच्या कलम 33 नुसार मूलभूत हक्क, सेनादलाना लागू करताना त्यात फेरबदल करण्याचा हक्क संसदेला आहे. संसद शांतता व सुव्यवस्थाच्या दृष्टीने फेरबदल करेल.

2] कलम 34 - मूलभूत हक्कावरील निर्बंध :-
कलम 34 नुसार ज्या प्रदेशात लष्करी कायद्याचा अंमल होता त्या प्रदेशातील शांतता व सुव्यवस्था ठेवण्यासाठी किंवा तेथील परिस्थिती पूर्वपदावर आणण्यासाठी भारतीय संसद मूलभूत हक्कांवर निर्बंध लागू शकते.

3] कलम 35 - मूलभूत हक्कांच्या अमलबजावणीसाठी कायदेशीर उपाय :-
राज्यघटनेच्या कलम 14 ते 32 मध्ये दिलेल्या मूलभूत हक्कांच्या उल्लंघनांच्या विरोधात शिक्षा करण्याच्या उद्देषाने कायदे करण्याचा अधिकार संसदेला आहे. संसद असे कायदे करू शकते.

IV - 36 to 51

प्रश्न राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे काय ते सांगून त्याचे वर्गीकरण स्पष्ट करा.

अ] प्रास्ताविक :-
भारतीय राज्यघटनेच्या कलम 36 ते 51 मध्ये चौथ्या भागात राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे दिली आहेत. राज्यसंस्थेने कोणती धोरणे ठरवावी त्याचे आधार म्हणजे मार्गदर्शक तत्त्वे होय. या मार्गदर्शक तत्त्वामुळे लोकशाही समता या तत्त्वांची पाठराखण होते. राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे आयरिश राज्यघटनेमधून घेतली आहे. तर हि तत्त्वे लागू करणे राज्याचे कर्तव्य आहे. असे कलम 37 मध्ये स्पष्ट केले आहे.

ब] मार्गदर्शक तत्वांचा अर्थ :

राज्याने विकासासाठी, संरक्षणासाठी ज्या आधारावर धोरणे ठरवायची असतात त्यांना मार्गदर्शक तत्त्वे असे म्हणतात. डॉ आंबेडकर असे म्हणतात की भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे आदर्श आर्थिक लोकशाही आहे. तसेच ती आदर्श राजकीय लोकशाही सुद्धा आहे. थोडक्यात आदर्श राज्यकारभारासाठी मार्गदर्शक तत्त्वे अत्यंत महत्त्वाची असतात.

क] मार्गदर्शक तत्त्वांचे वर्गीकरण :-

सर्वसाधारणपणे आर्थिक, सामाजिक, शांतता, विचारसरणी अशा वेगवेगळ्या प्रकारे मार्गदर्शक तत्त्वांचे वर्गीकरण केले जाते. प्रामुख्याने मार्गदर्शक तत्त्वांचे वर्गीकरण करताना चार भाग पाडले जातात ते पुढीलप्रमाणे :-

1] आर्थिक व सामाजिक मार्गदर्शक तत्त्वे :-

भारतात कल्याणकारी व सामाजिक न्यायावर आधारित राज्यव्यवस्था निर्माण करण्यासाठी आर्थिक व सामाजिक मार्गदर्शक तत्त्वे महत्त्वाची ठरतात. ती ~~करू~~ पुढीलप्रमाणे आहेत → सर्व स्त्री व पुरुष यांना उपजीविकेचे साधन मिळवण्याचा समान हक्क असावा → सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी संपत्तीचे अधिकार व त्यावरील नियंत्रण असावे → महिला व पुरुष यांना समान कामासाठी समान वेतन मिळावे → बालकांना स्वच्छ व निरोगी वातावरणात विकासाच्या संधी, सुविधा मिळाव्यात → सरकारकडून विकासाची गरज लक्षात घेऊन नागरिकांना शिक्षणाचा हक्क, बेकारी, आरोग्य या संदर्भात मदत दिली जाईल → राज्याच्या कायद्याद्वारे कामगारांना निर्वाह वेतन देण्याचा प्रयत्न असेल → अनुसूचित जाती जमातीमधील लोकांसाठी आर्थिक व शैक्षणिक संधी शासनाकडून पुरवल्या जातील → नागरिकांचा सामाजिक व आर्थिक दर्जा स्वाभिमानाचा दर्जा उंचावण्यासाठी शासन प्रयत्न करेल → शासन आधुनिक पद्धतीने शेती व पशुसंवर्धन यांची व्यवस्था करेल → राष्ट्रीय स्मारके, वास्तू यांचे संरक्षण करण्यासाठी व्यवस्था राज्याकडून केली जाईल.

1980 – BJP – कलम 370 रद्द करण्याबाबत
जम्मू काश्मीर

२) गांधीवादी तत्त्वे :-
भारतात राज्याच्या धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वावर गांधीजींच्या विचारांचा प्रभाव पडला आहे अशी तत्त्वे पुढीलप्रमाणे आहेत. → राज्यांकडून प्रत्येक गावात ग्रामपंचायतीची स्थापना केली जाईल → राज्य ग्रामीण भागात हस्त उद्योग, लघुउद्योग यांना संरक्षण देऊन त्याचे संवर्धन करेल → राज्य नागरिकांचे आरोग्य धोक्यात आणणाऱ्या मादक पदार्थावर बंदी घालेल. → राज्य गोवंश हत्या बंदी व कत्तलखान्या संदर्भात कायदे करेल.

३) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेविषयी तत्त्वे :-
जागतिक पातळीवर प्रत्येक देशाने शांतता निर्माण करण्यासाठी योगदान द्यावे त्याकरिता आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेविषयी काही तत्त्वे मांडली आहेत → राष्ट्राराष्ट्रामध्ये शांतता निर्माण करण्यासाठी भारत प्रयत्न करेल → सर्व राष्ट्रांनी एकमेकांशी न्यायाने वागावे इतरांशी आदर बाळगावा → प्रत्येक राष्ट्राने व राष्ट्रातील नागरिकांनी आंतरराष्ट्रीय कायदे करावे करार यांचे पालन करावे → राष्ट्राराष्ट्रामधील संघर्ष शांततेच्या मार्गाने सोडविण्यासाठी राज्यानी प्रयत्न करावा.

४) संकीर्ण तत्त्वे :-
→ शासन सर्व नागरिकांसाठी समान नागरीकायदा करण्यासाठी प्रयत्न करेल. → आर्थिक व इतर कारणामुळे मागास लोकांना न्याय प्राप्त होण्यासाठी मोफत कायदेशीर सल्ला देण्याचा प्रयत्न करेल. → सरकारकडून नैसर्गिक संपत्ती व वनांचे संवर्धन केले जाईल.

३) मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्त्वे यातील फरक :-
भारतीय राज्यघटनेने नागरिकांना स्वविकासासाठी मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्त्वांची तरतूद केली आहे. मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्त्वांचा हेतू एकच असला तरी त्यांच्यात फरक दिसून येतो. तो पुढीलप्रमाणे :
१) व्यक्तीविकासाच्या बाबतीत नागरिकांच्या विशिष्ट बाबीमध्ये शासनाने हस्तक्षेप करू नये असे मूलभूत हक्क सांगतात तर राष्ट्राच्या विकासासाठी शासनाने राज्य कारभार कसा करावा हे सांगण्याचे काम मार्गदर्शक तत्त्वे करतात.

२) मूलभूत हक्कांमुळे लोकशाही प्रस्थापित झाली. तर मार्गदर्शक तत्वांमुळे त्या लोकशाहीत सामाजिक आर्थिक घटकांना महत्त्व देण्यात आले.
३) मूलभूत हक्कांना कायदेशीर मान्यता आहे. राज्याने ते पाळणे बंधनकारक आहे. तर मार्गदर्शक तत्वे राज्याने पाळणे बंधनकारक नाही.
४) मूलभूत हक्कांना न्यायालयीन संरक्षण आहे. तर मार्गदर्शक तत्वांना न्यायालयीन संरक्षण नाही.
५) मूलभूत हक्कांचे क्षेत्र नागरिकांपुरते मर्यादित आहे तर मार्गदर्शक तत्वांचे क्षेत्र सर्वव्यापी आहे.

मूल्यमापन
मार्गदर्शक तत्वांचे मूल्यमापन करता असे दिसते की, कोणत्याही राष्ट्रात सामाजिक, आर्थिक लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे महत्त्वाची भूमिका बजावतात. परंतु मार्गदर्शक तत्वे न्याय प्रविष्ठ नसल्यामुळे त्याचे स्वरूप नैतिक तत्वाप्रमाणे होते त्यामुळे RC व्हिअर असे म्हणतात की मार्गदर्शक तत्वे ही आशावादी व आदर्शवादी असून ते फक्त अपेक्षा जाहिरनामा आहे. तर K.T Shah यांच्या मते "मार्गदर्शक तत्वे म्हणजे बँकेच्या सोयीनुसार वटविला जाणारा चेक आहे. थोडक्यात असे असले तरी आर्थिक प्रगतीसाठी, नागरिकांच्या उपजीविकेसाठी, सत्ता विकेंद्रीकरणासाठी मार्गदर्शक तत्वे कल्याणकारी असलेली दिसतात.

प्रश्न भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्वे स्पष्ट करा.
अ) प्रास्ताविक :-
मागच्या प्रश्नाचे प्रास्ताविक आहे तसेच लिहिणे.
ब) भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्वे :-
भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या भागात कलम ३६ ते ५१ मध्ये विविध मार्गदर्शक तत्वे दिलेली आहेत. मार्गदर्शक तत्वांवर आयर्लंड, स्पेन, युगोस्लाव्हिया, इत्यादी देशामधील मार्गदर्शक तत्वांचा प्रभाव पडला आहे. तसेच १९३५ च्या कायद्यातील तरतुदी, मागणी हक्कांचा जाहिरनामा, महात्मा गांधीजींचे विचार, उपयोगितावादी व उदारतवादी व विचारांचा प्रभाव मार्गदर्शक तत्वांवर पडला आहे. जवळजवळ २० प्रकारचे

मार्गदर्शक तत्त्वे राज्यघटनेत नमूद केली आहेत. ती पुढीलप्रमाणे :-

1] कलम 36 व 37 - राज्यांसाठीची मार्गदर्शक तत्त्वे :-

राज्यांसाठी लागू असणारी मार्गदर्शक तत्त्वे कलम 36 अन्वये स्पष्ट केली आहेत - देशाचा राज्यकारभार करताना हि तत्त्व लागू करणे ते शासनाचे कर्तव्य असेल. परंतु कलम 37 नुसार मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणी करत न्यायालयात जाता येणार नाही.

2] कलम 38 - लोककल्याणकारी समाज व्यवस्था :-

कलम 38 नुसार राष्ट्र सामाजिक, आर्थिक, राजकीय न्यायाद्वारे समाजव्यवस्था निर्माण करून लोकांचे हित जोपासेल तसेच राष्ट्राकडून सर्व क्षेत्रामध्ये असलेली उत्पन्नाची विषमता कमी केली जाईल.

3] कलम 39 - धोरणविषयक तत्त्वे :-

कलम 39 नुसार राज्य विविध बाबी साध्य करण्यासाठी धोरण ठरवेल.

→ उपजीविकेचे साधन स्त्री पुरुषांना समान उपलब्ध करून दिले जाईल.

→ समाजविकासासाठी राज्यातील साधनसंपत्तीचे समान वाटप केले जाईल.

→ स्त्री पुरुषांना समान कामासाठी समान वेतन दिले जाईल.

→ लहान बालकांना निरोगी वातावरणात विकासाच्या संधी उपलब्ध करून दिले जाती

4] कलम 39 क - समान न्याय व मोफत कायदेविषयक मदत :-

39 क नुसार राज्याची यंत्रणा राबविल असताना सर्वांना समान न्यायाचे तत्त्व लागू केले जाईल. सर्व नागरिकांना कायदेविषयक सहाय्य मोफत दिले जाईल.

5] कलम 40 - ग्रामपंचायतीची स्थापना

कलम 40 नुसार राज्याकडून ग्रामपंचायतीची स्थापना केली जाईल. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मुलभूत हक्क म्हणून ते कार्य करेल.

6] कलम 41 - शिक्षण व शासकीय मदत

कलम 41 नुसार राज्याकडून प्रत्येक नागरिकांमध्ये आर्थिक क्षमता निर्माण करण्यासाठी, शैक्षणिक प्रसारांसाठी प्रयत्न केले जातील. बेकारी दारिद्र्यामुळे मदत

करण्यासाठी प्रयत्न केला जाईल.

कलम ४२ - कामाच्या ठिकाणी न्याय
या कलमानुसार राज्य कामाच्या ठिकाणी समान न्यायाचे तत्त्व लागू करेल. उदा.., महिलांना मानवी परिस्थिती पाहून विशेष सोयी दिल्या जातील.

९] कलम ४३ - कामगारांना निर्वाह वेतन
या कलमानुसार राज्यांकडून सरकारी उद्योग क्षेत्रातील व अन्य क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना राज्यांकडून निर्वाह वेतन दिले जाईल.

१] कलम ४३ क - व्यवस्थापनात कर्मचाऱ्यांचा सहभाग
या कलमानुसार राज्य सर्व सरकारी उद्योगधंद्यात काम करत असणाऱ्या कामगारांना कायद्याद्वारे सहभागी करून घेईल.

१०] कलम ४४ - समान नागरी कायदा
या कलमान्वये भारतात सर्व क्षेत्रामध्ये समान नागरी कायदा लागू करण्यात येईल.

११] कलम ४५ - बालकांचे शिक्षण
या कलमानुसार वय वर्षे ६ पूर्ण होईपर्यंत सर्व बालकांची देखभाल व शिक्षणाची सोय राज्यांकडून केली जाईल.

१२] कलम ४६ - अनुसूचित जाती जमातीसाठी शैक्षणिक व आर्थिक तरतूदी
या कलमानुसार राज्यांकडून अनुसूचित जाती जमातीच्या नागरीकांना शैक्षणिक विकासासाठी विविध सवलती दिल्या जातील. त्यावर सामाजिक अन्याय होणार नाही याची काळजी घेऊन राज्यांकडून घेतली जाईल.

१३] कलम ४७ - नागरिकांचे राहणीमान
॥ कलम ४७ नुसार देशातील सर्व नागरीकांचे राहणीमान उंचावणे, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेची विभागणी करणे, व अंमली पदार्थावर बंदी घालणे. यासाठी राज्य प्रयत्न करेल.

१५] कलम ४८ - कृषी व पशु संवर्धन
या कलमानुसार राज्याकडून आधुनिक व शास्त्रीय पद्धतीने शेती करण्याची धोरण आखले जाईल. तसेच राज्य पशु संवर्धनाची योजना आखेल.

१६] कलम ४८ क - पर्यावरण संरक्षण
या कलमानुसार पर्यावरणाचे संवर्धन व संरक्षण, वन्य जीवसृष्टीचे संरक्षण राज्याकडून केले जाईल.

१६] कलम ४९ - राष्ट्रीय स्मारकांचे संरक्षण
कलम ४९ नुसार भारतातील राष्ट्रीय स्मारके वास्तु यांचे संरक्षण राज्याकडून केले जाईल.

१७] कलम ५० - न्यायालयीन स्वातंत्र्य
कलम ५० नुसार न्याय यंत्रणा व कार्यकारी यंत्रणा या विभक्त राहून निपक्षपातीपणे काम करतील.

१८] कलम ५१ - आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता
कलम ५१ नुसार राज्याकडून आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेसाठी प्रयत्न केले जातील. आंतरराष्ट्रीय कायद्याचे पालन केले जाईल. राष्ट्राराष्ट्रामधील संघर्ष सोडविण्यासाठी प्रयत्न केला जाईल.

सारांश :-
भारतीय राज्यघटनेमध्ये नमूद केलेली कलम ३६ ते ५१ मधील राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे आदर्श आहेत. त्यांची अंमलबजावणी झाल्यास भारत जगातील एक आदर्श व समृद्ध राष्ट्र म्हणून विकसित होईल.

प्रकरण ३ :- कायदे मंडळ व न्यायमंडळ (संसद)

प्रश्न १ भारतातील संसदेच्या ऐतिहासिक वारसा स्पष्ट करा. किंवा भारतीय संसदे. ऐतिहासिक जडणघडणीवर चर्चा करा.

अ] प्रास्ताविक :

केंद्रीय कायदेमंडळाला भारतात संसद (parliament) असे म्हणतात. राज्यघटनेमध्ये 5 व्या भागात प्रकरण 2 मध्ये कलम 79 ते कलम 122 मध्ये संसद व तिची रचना याविषयी तरतुदी करण्यात आल्या आहेत. कलम 79 नुसार भारतासाठी एक संसद असेल ती लोकसभा, राज्यसभा व राष्ट्रपती यांनी मिळून बनेल. भारतावर ब्रिटिशांचे राज्य होते. त्याकेन भारतीय राज्यघटनेमध्ये विविध बाबी आल्या आहेत थोडक्यात भारतीय घटना निर्मितीवर विविध गोष्टींचा प्रभाव पडला आहे.

ब] ऐतिहासिक मागोवा :-

भारतीय संसदेला ब्रिटिशांच्या ऐतिहासिक वारसा आहे. ब्रिटिश सत्तेच्या विरोधात भारतीयांनी 1857 ला पहिला लढा दिला. त्याच्या परिणाम म्हणजे भारतात 1858 मध्ये राणीच्या जाहिरनामा प्रसिद्ध झाला. ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता जाऊन विक्टोरिया राणीची सत्ता सुरू झाली. भारतीय संसदेला खऱ्या अर्थाने इथूनच सुरुवात झाली. 1858 च्या भारत सरकार कायद्याने विधिमंडळ समितीचा उदय, भारतीय सदस्यांचे नामांकन व त्यांची निवडणूक, कायदेमंडळाला प्रश्न विचारण्याचा हक्क यांची तरतुद करण्यात आली.

1] 1861 चा इंडियन कौन्सिल (council) Act :-
Indian council Act :

1861 च्या कायद्यानुसार भारत सचिव व parliament मधील सदस्यांची तरतुद करण्यात आली. तसेच भारताच्या सचिव हा भारतीय प्रशासनासंबंधी संसदेला जबाबदार राहून काम करेल. तो काम करत असताना Governor General ची मदत होईल तर कार्यकारी मंडळात बिगर कार्यालयीन सदस्यांना घेण्यात आले.

2] 1892 चा Indian council Act) :-

या कायद्यानुसार बिगर कार्यालयीन सदस्यांची नेमणूक करण्याचा हक्क

प्रांतीय विधिमंडळाला देण्यात आला तर Council ला अर्थसंकल्पावर चर्चा करण्याचा आणि कार्यकारी मंडळाला प्रश्न विचारण्याचा हक्क देण्यात आला.

3] १९०९ चा मोर्ले-मिंटो सुधारणा कायदा :
या कायद्यानुसार भारतात प्रतिनिधीत्वांचे तत्व स्वीकारले गेले. केंद्रीय स्तरावर विधान परिषदेत निवडणूक प्रक्रिया स्वीकारली परंतु अधिकाऱ्यांना बहुमताचा हक्क देण्यात आला. विधान परिषदेच्या अधिकारांमध्ये व प्रांतीय विधिमंडळाच्या संख्येत वाढ करण्यात आली. त्यामुळे मुस्लिमांना स्वतंत्र प्रतिनिधीत्व मिळाले.

4] १९१९ च्या मॉन्टेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा कायदा :
या कायद्यानुसार प्रांतात जबाबदार शासन पद्धती सुरू झाली केंद्रीय कायदेमंडळ द्विसदनी बनवण्यात आले. सभागृहात निर्वाचीत सदस्य नेमण्यात आले कनिष्ठ सभागृहात १४५ व वरिष्ठ सभागृहात 60 सदस्य नेमण्यात आले. मुस्लिम, शीख, युरोपियन इत्यादीसाठी स्वतंत्र मतदार संघ निर्माण करण्यात आले.

5] 1935 चा भारतीय प्रशासकीय कायदा :
या कायद्याला छोटी राज्यघटना असे म्हणतात. या कायद्याने भारतात संघराज्य पद्धत सुरू झाली. भारतातील ।। प्रांत व विविध राज्ये यांचे संघराज्य निर्माण झाले. पूर्वीचे सचीव पद रद्द करण्यात आले. राज्यकारभाराची विभागणी केंद्र व राज्य अशी करण्यात आली त्यानुसार केंद्र व राज्यांचे अधिकार ठरवून दिले.

या पार्श्वभूमीवर भारतीय राज्यघटना निर्माण झाली १९४6 मध्ये संविधान सभा स्थापन झाली. त्यात ३८९ सदस्य होते घटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी काम पाहिले. 26 नोव्हें १९४९ रोजी आपली राज्यघटना स्वीकारण्यात आली तर 26 जाने. 1950 पासून राज्यघटनेची अंमलबजावणी सुरू झाली.

प्रश्न 2 लोकसभेची रचना व अधिकार कामे स्पष्ट करा।

अ] प्रास्ताविक :-

लोकसभा हे भारतीय संसदेचे कनिष्ठ सभागृह आहे लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या समावेश या सभागृहात होतो. भारतातील लोकसभेची पहिली निवडणूक 25 ऑक्टो 1951 ते 21 फेब्रु 1952 या काळात झाली लोकसभा जनतेचे सभागृह म्हणून ओळखली जाते.

ब] लोकसभेची रचना :-

राज्यघटनेमध्ये कलम 81 नुसार लोकसभा निर्माण झाली आहे. लोकसभेची सदस्य संख्या 545पेक्षा कमी व 500 पेक्षा जास्त असणार नाही. घटक राज्यांचे कमीत कमी 525 सदस्य केंद्रशासित प्रदेशांचे कमीत कमी 20 सदस्य, व ॲंग्लो इंडियन समाजाचे राष्ट्रपती नियुक्त 2 सदस्य लोकसभेत असतील. सध्या लोकसभेमध्ये 547 सदस्य आहेत. लोकसभेमध्ये सर्वसाधारण अनुसूचित जाती जमाती यांच्यासाठी वेगळ्या मतदारसंघाची निर्मिती करण्यात आली आहे.

क]पात्रता :-

लोकसभेच्या निवडणुकीत प्रत्येक भारतीय नागरिक ज्याने 18 वयवर्षे पूर्ण केले आहे तो मतदान करू शकतो. तर ज्याना लोकसभेची निवडणूक लढवायची आहे ती व्यक्ती भारतीय नागरिक असावी तिचे वय 25 वर्षे पूर्ण असावे.

ड] निवडणूक पद्धती व मतदार संघ :-

लोकसभेच्या निवडणुकीसाठी कमीत कमी 5 लाख व जास्तीत जास्त साडे सात लाख लोकसंख्येच्या एक मतदार संघ निर्माण करून प्रत्येक मतदार संघाकडून बहुमताच्या जोरावर एक प्रतिनिधी निवडला जातो. म्हणजे प्रत्येक घटकराज्याच्या लोकसंख्येच्या मतदार संघ तयार केले जातात.

उदा.. भारतात उत्तर प्रदेश मधून सर्वात जास्त 80, महाराष्ट्राकडून 48 तर मिझोराम, नागालँड येथून सर्वात कमी म्हणजे 1 प्रतिनिधी निवडला जातो

Page No
Date

ड] कार्यकाल व गण संख्या :-
लोकसभेचा कार्यकाल हा 5 वर्षांचा आहे. तत्पूर्वी प्र पंतप्रधानाचा राजीनामा म्हणजे लोकसभेचे विसर्जन ठरलेले असते. त्यामुळे लोकसभेचा कार्यकाल जरी 5 वर्ष असला तरी त्या अगोदर लोकसभा विसर्जीत होऊ शकते. लोकसभेचे कामकाज चालवण्यासाठी सभागृहात किमान 1 दशांश सदस्य किंवा कमीत कमी 55 सदस्य असणे आवश्यक आहे.

ई] लोकसभेचे सभापती/उपसभापती :-
राज्यघटनेच्या कलम 93 ते 97 मध्ये लोकसभेच्या अध्यक्ष व उपाध्यक्षाची तरतूद केली आहे. त्यांच्या कामकाजासाठी एक सचीवालय आहे. सचीवालयात एक मुख्य सचीव व 250 कर्मचारी आहेत.
पंडित नेहरूंच्यामते, सभापती संपूर्ण सभागृहाचे प्रतिनिधत्व करतात. त्यांना सभागृहाचा नेता म्हणून निपक्ष पातीपणे काम करावे लागते. सभापतींचा कार्यकाल 5 वर्षांचा असतो. परंतु त्यापूर्वी लोकसभा विसर्जीत झाल्यास त्यांना पदमुक्त व्हावे लागते किंवा ते स्वमर्जीने राजीनामा देऊ शकतात.

फ] सभापतीची अधिकार कामे :
सभापतीपद हे भारतात सन्मानाचे व जबाबदारीची मानले जाते. संसदेच्या नियमानुसार, संविधानातील तरतुदींच्या आधारे लोकसभेचे अध्यक्ष आपले अधिकार वापरतात.
1] लोकसभेच्या दैनंदिन कामकाजाचे नियोजन करणे
2] लोकसभेच्या अधिवेशनात विविध विधेयकांवर चर्चा करणे, संसदेच्या नियमानुसार कामकाज करणे सभागृहातील कामकाजावर व गोंधळावर नियंत्रण ठेवणे.
3] सभागृहाच्या कामकाजात अडचणी आल्यास कामकाज स्थगित करणे.
4 सभागृहाची प्रतिष्ठा व दर्जा कायम राखणे.
5] सभागृहातील सभापतीचे आदेश मानत नसतील तर, असंसदीय भाषा वापरत असतील तर किंवा सभागृहाची दिशाभूल करणारी माहिती सादर करत असतील तर त्यांना शिक्षा करणे.
6] सभागृहातील सदस्यांच्या अधिकाराचे संरक्षण करणे
7] संसदेच्या संयुक्त अधिवेशनाचे वेळी अध्यक्ष स्थान भूषविणे.

न] सभागृहामध्ये मुख्यादया प्रश्नावर, विधेकांवर चर्चा करणे, स्थगत प्रस्ताव मान्य करणे, महत्त्वाच्या प्रश्नांवर निर्णय होणे याविषयीचे अधिकार सभापतींना आहेत.

ड] लोकसभेत सादर केलेली विधेयक धनविधेयक आहेत की नाही हे ठरविणे

च] सभागृहात जर मुख्यादया विषयावर, विधेयकावर मतदान होऊन समान मध्ये पडल्यास निर्णायक मत देण्याचा अधिकार सभापतीना आहे

ण] मुख्यादया सदस्यांने पक्षांतर केले किंवा नाही याविषयीचा निर्णय देण्याचा अधिकार सभापतीना आहे.

लोकसभेत जनतेचे प्रतिनिधी असल्याने जनतेच्या प्रश्नांची मांडणी केली जाते. सत्ताधारी पक्ष जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी विविध धोरणे ठरवित असतो. विरोधी पक्ष चुकीच्या धोरणावर सातत्याने टिका करीत असतो अशा वेळी सभागृहाचे कामकाज सुरळित चालविण्याची जबाबदारी सभापतींवर येते.

प्रश्न ३ विधिमंडळाच्या कायदेनिर्मितीच्या प्रक्रियेवर सविस्तर चर्चा करा. किंवा भारतातील कायदेनिर्मितीची प्रक्रिया स्पष्ट करा.

अ] प्रास्ताविक :

कायदेमंडळाचे मुख्य कार्य म्हणजे कायद्याची निर्मिती करणे होय. भारतीय राज्यघटनेच्या कलम 117 ते 122 मध्ये कायदेनिर्मितीच्या प्रक्रियेची तरतूद केली आहे.

ब] कायदेनिर्मितीची प्रक्रिया :

कायदे मंडळ कायदे तयार करते सभागृहामध्ये विधेयक मांडल्यानंतर त्याचा प्रकार ठरवला जातो. त्यानुसार कार्यपद्धती सुरू होते. दोन्ही गृहात वाचने होतात संमती दिली जाते व त्यानंतर राष्ट्रपतीची स्वाक्षरी होते. तेव्हा विधेयकाचे कायद्यात रूपांतर होते.

क] विधेयके :-

सर्वसाधारणपणे विधेयकाचे सामान्य विधेयक व अर्थविधेयक असे

कायदे निर्मिती → कायदेमंडळ (संसद)
विधेयक

सर्वसाधारण / सामान्य — सरकारी, खासगी

धन / वित्त / अर्थ → पैसा संबंधातील विधेयक / आर्थिक विधेयक

दोन प्रकार पडतात :

1] सर्वसाधारण / सामान्य विधेयक :-

भारतात सर्वसाधारण विधेयकाचे दोन प्रकार पडतात ते म्हणजे सरकारी विधेयक व खासगी विधेयक होय. ही विधेयके लोकसभा किंवा राज्यसभा या कोणत्याही सभागृहामध्ये मांडली जातात. सरकारी विधेयके सरकारकडून व खासगी विधेयके संसदेच्या कोणत्याही सदस्यांकडून सभागृहात मांडली जातात. सर्वसाधारण विधेयकाचे कायद्यात रूपांतर होताना त्याला पुढील प्रक्रियेतून जावे लागते :

i] विधेयक निर्मिती :-

विधेयकांची निर्मिती करण्याचे काम संबंधित खात्याकडे असते खात्याचा मंत्री प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून माहिती गोळा करतो ती माहिती तपासून, तिचे विश्लेषण करून प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या सहकार्याने मसुदा तयार केला जातो. त्याला विधेयक असे म्हणतात.

ii] प्रथम सभागृहात मांडणे :-

लोकसभेत विधेयक मांडणे म्हणजे प्रथम गृहामध्ये मांडणे होय. सर्वसाधारण विधेयक लोकसभा किंवा राज्यसभा या कोणत्याही सभागृहामध्ये पहिल्यांदा मांडला येते. परंतु ते मांडण्यापूर्वी एक महिना अगोदर सभापतीची परवानगी घ्यावी लागते. सभापतीची परवानगी नंतर ते विधेयक मांडला येते. → प्रथम वाचन = प्रथम वाचन म्हणजे संबंधित खात्याचे प्रमुख विधेयकाची माहिती सभागृहाला सांगतो. त्या विधेयकाची लेखी प्रत सभागृहातील सर्व सभासदांना दिली जाते. विधेयक मंजूर की नामंजूर यावर मतदान घेतले जाते. विधेयकाच्या बाजूने बहुमत झाल्यास पुढील कार्यवाहीसाठी पाठविले जाते. जर विधेयकाच्या विरोधात बहुमत झाले तर ते विधेयक रद्द होते.

→ द्वितीय वाचन – प्रथम वाचनानंतर महत्त्वाचे विधेयक असल्यास दुसऱ्या दिवशी किंवा कमी महत्त्वाचे विधेयक असल्यास दोन दिवसानंतर त्या विधेयकाचे द्वितीय वाचन घेतले जाते. द्वितीय वाचनावेळी विधेयकावर चर्चा केली जाते. आवश्यकता असल्यास ते विधेयक जनतेच्या मतासाठी मांडले जाते. त्यासाठी विशिष्ट कालावधी दिला जातो.

→ समिती अवस्था = द्वितीय वाचनावेळी एखादे विधेयक जर संसदेच्या समितीकडे चिकित्सेसाठी पाठविले तर ते प्रवर समितीकडे येते. या समितीत कमीत कमी 20 व जास्तीत जास्त 30 सदस्य असतात त्यात विधेयक मांडणाऱ्या मंत्र्याचा समावेश असतो तर एकूण सदस्यांपैकी 1/4 सदस्य विरोधी पक्षाचे असतात. प्रवर समिती या विधेयकावर दुरुस्त्या सुचवू शकते.

→ अहवाल वाचन = प्रवर समिती तीन महिन्यांच्या आत आपला अहवाल सादर करते. त्याच्या छापील प्रती सर्व सभासदांना दिल्या जातात. सभागृहात त्यावर सखोल चर्चा केली जाते. आवश्यकता असल्यास मतदान घेतले जाते व अंतिम मसुदा तयार केला जातो.

→ तृतीय वाचन = तृतीय वाचन म्हणजे विधेयकाचे शेवटचे वाचन होय या वेळी विधेयक मान्य की अमान्य हे ठरविले जाते. सभापतीनी ठरविलेल्या दिवशी हे तिसरे वाचन घेऊन सभागृहाचे अध्यक्ष विधेयकावरचा निर्णय घोषित करतात.

iii) द्वितीय गृहातील प्रक्रिया :-

भारतात द्वितीय गृहामध्ये विधेयक आल्या नंतर पहिल्या गृहामध्ये झालेल्या पाच प्रक्रियेनुसार पुन्हा एकदा तशीच प्रक्रिया होते व विधेयकाची मंजूरी किंवा नामंजूरी कळवली जाते. दुसऱ्या गृहात जर विधेयकासंदर्भात वाद निर्माण झाला तर दोन्ही गृहाची संयुक्त बैठक बोलवली जाते. लोकसभेचे अध्यक्ष त्याचे नियमन करतात.

iv) राष्ट्रपतीची स्वाक्षरी :

दोन्ही गृहामध्ये जेव्हा विधेयकाला मंजूरी मिळते तेव्हा ते विधेयक राष्ट्रपतीच्या मंजूरीसाठी पाठविले जाते. त्यावर राष्ट्रपतीची सही झाल्यानंतर विधेयकाचे कायद्यात रूपांतर होते किंवा राष्ट्रपती ते विधेयक चर्चेसाठी पुन्हा सभागृहाकडे पाठवू शकतात. सभागृहाने त्यावर फेरविचार करून राष्ट्रपतीकडे सादर केलेल्या विधेयकावर राष्ट्रपतींना सही करावीच लागते.

ब] धन विधेयके / अर्थ विधेयके :-

धन विधेयकालाच वित्त विधेयक किंवा अर्थ विधेयक असे म्हणतात. ज्या विधेयकाद्वारे कर लावण्यासंबंधी नियम तयार केले जातात. देशाच्या एकत्रित निधीच्या, आकस्मिक निधीच्या संदर्भात तरतुदी असलेले विधेयक किंवा आर्थिक खर्चाच्या संदर्भात तरतुदी असलेले विधेयक म्हणजे अर्थ विधेयक होय. एखादे विधेयक अर्थ विधेयक आहे किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार लोकसभेच्या सभापतींना आहे. संसदेमध्ये प्रत्येक वर्षी मांडला जाणारा अर्थसंकल्प अर्थ विधेयकाशी संबंधित असतो. सर्वसाधारण विधेयक व आर्थिक विधेयकाच्या कायदे निर्मितीच्या प्रक्रियेमध्ये फरक असतो.

→ कायदे विषयक प्रक्रिया :-

भारतात राज्यघटनेच्या कलम 112 ते 117 मध्ये अर्थविधेयकाविषयी तरतुदी केल्या आहेत. त्यानुसार धनविधेयक ठरविले जाते.

* I] कोणताही कर बसवणे, रद्द करणे, त्यात फेरबदल करणे

II] केंद्रसरकारने कर्ज काढणे

III] भारताच्या संचित निधीतून किंवा आकस्मिक निधीतून पैसे काढणे किंवा भरणे.

कलम 109 नुसार धन विधेयक पहिल्यांदा लोकसभेत मांडले जाते ते राज्यसभेत मांडता येत नाही. लोकसभेत या विधेयकाला मंजुरी घेतली जाते. त्यानंतर ते शिफारशीकरिता राज्यसभेकडे पाठविले जाते. राज्यसभा 14 दिवसाच्या आत आपल्या शिफारशी लोकसभेला कळविते. राज्यसभेने 14 दिवसात न कळविल्यास राज्यसभेला ते विधेयक मान्य आहे असे समजले जाते तर राज्यसभा धनविधेयक नाकारू शकत नाही किंवा त्यात दुरुस्त्या करण्याचा अधिकार राज्यसभेला नाही. त्यानंतर राष्ट्रपतींच्या सहीनंतर अर्थविधेयकाचे कायद्यात रुपांतर होते.

प्रश्न. ४ संसदीय समित्या

अ] प्रास्ताविक :-

संसदेच्या कामकाजात विविध समित्यांचे स्थान महत्त्वाचे असते. कायदा निर्मितीची प्रक्रिया, आर्थिक धोरण निर्मितीची प्रक्रिया या गोष्टींमध्ये समित्या महत्त्वाचे योगदान देत असतात. विविध समित्यांमध्ये सर्व राजकीय पक्षांचे सदस्य प्रतिनिधी म्हणून काम पाहतात. भारतात संसदीय समितीला सभागृहाची लहान प्रतिकृती म्हणतात.

ब] समित्यांचे प्रकार :-

भारतामध्ये संसदीय समित्यांचे दोन प्रकार पडतात. ते म्हणजे स्थायी समिती व तदर्थ समिती होय. स्थायी समितीमध्ये सर्वसाधारण कायदेविषयक व अर्थविषयक समित्या असे तीन उप्रकार पडतात.

क] स्थायी समिती :-

स्थायी समिती दरवर्षी निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी तयार होते. या स्थायी समितीच्या विविध उपसमित्या आहेत. त्यांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे :-

* 1] सर्वसाधारण समित्या :-

1] नियम समिती :-

या समितीत 15 सदस्य असतात. सभागृहाचे सभापती अध्यक्ष असतात ते सदस्यांची नेमणूक करतात ही समिती सभागृहाच्या कामकाजाविषयी योग्य ते बदल सुचवते.

2] कामकाज सल्लागार समिती :-

या समितीत 15 सदस्य असतात सभागृहाचे सभापती अध्यक्ष असतात. या समितीची स्थापना अधिवेशनाच्या सुरुवातीला होते. ही समिती सरकारी विधेयक केव्हा व किती वेळ चर्चा करावी याविषयी सरकारी विधेयकावर चर्चा करावी याचे वेळापत्रक ठरवते.

3] विशेष अधिकार समिती :-
या समितीत 15 सदस्य असतात ही समिती सभागृहाचे अधिकार भंग करणाऱ्या घटनांची चौकशी करुन अहवाल सादर करते.

4] सभासदांच्या गैरहजेरीबाबत समिती :-
ही समिती 15 सदस्यांची असते तिचा कार्यकाल 1 वर्षाचा आहे. सभागृहात हजर राहण्यासाठी ही समिती परवानगी देते. तसेच गैरहजर अर्जाचा विचार करते.

5] सरकारी आश्वासन समिती :-
सभागृहात जेव्हा मंत्री आश्वासने देत असतात त्याची अंमलबजावणी योग्य वेळेत होते किंवा नाही हे पाहण्याचे काम ही समिती करते त्याचा अहवाल सभागृहाला सादर करते.

6] सभागृहाच्या पटलाकडे कागदपत्राविषयक समिती :-
या समितीत 15 सदस्य असतात त्याचा कार्यकाल 1 वर्ष इतका असतो ही समिती सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवत असताना राज्यघटना व कायदे याचे पालन झाले किंवा नाही याची तपासणी करते.

7] अनुसूचित जाती जमातींसाठी कल्याण समिती :-
या समितीत जास्तीत जास्त 20 सदस्य असतात. कोणताही मंत्री या समितीचा सदस्य असत नाही. अनुसूचित जाती जमातींच्या विकासविषयक योजनांची अंमलबजावणी होते किंवा नाही हे पाहण्याचे काम ही समिती करते.

* 2] विधीविषयक समस्या :-
1] प्रवर समित्या :-
एखाद्या विधेयकासाठी त्याच्यावर विचार करण्यासाठी प्रवर समितीची स्थापना केली जाते तिला चिकित्सा समिती असेही म्हणतात. विधेयकाचे दुसरे वाचन करताना प्रवर समितीकडे ते वाचन येते. त्यावर प्रवर समिती आपला अभिप्राय देते. सभागृहाचे उपसभापती या समितीचे अध्यक्ष असतात

कमीत कमी 20 व जास्तीत जास्त 30 सदस्य या समितीत असतात.

२] याचिका समिती :-
या समितीला अर्जसमिती असेही म्हणतात. नागरिकांना सार्वजनिक दृष्टीने महत्त्वाच्या विषयावर अर्ज करायचा असल्यास या समितीकडे करता येतो. अर्जसमिती त्याची छाननी करून त्या विषयांवर उपाययोजना करते. अध्यक्षानी निवडलेले 15 सदस्य या समितीत असतात.

३] खासगी सदस्यांच्या विधेयकाबाबतची समिती :-
या समितीत सभापतीने नेमलेले 15 सदस्य असतात त्यांचा कालावधी एक वर्षाचा आहे. खासगी विधेयकाची चौकशी करणे व ती चौकशीसाठी सभागृहात आणण्याचे काम ही समिती करते.

४] प्रदत्त विधिनियम समिती :-
या समितीत 15 सदस्य असतात. अध्यक्ष त्यांची नेमणूक करतात. समितीचा कालावधी 1 वर्ष असतो. कायदेमंडळातील कायदे करण्याचा हक्क कार्यकारी मंडळाला देणे म्हणजे प्रदत्त विधान होय. ही समिती कार्यकारी मंडळाने केलेले कायदे मंडळ कायद्यासोबत आहेत की नाहीत ते तपासण्याचे काम करते.

५] संयुक्त समिती :-
या समितीत लोकसभा व राज्यसभा या दोन्ही सभागृहातील निवडलेले सदस्य असतात. जेव्हा एखाद्या विधेयकावर मतभेद निर्माण होतो तेव्हा ही समिती त्यावर काम करते.

* आर्थिक समित्या
1] लोकलेखा समिती :-
1923 मध्ये या समितीची स्थापना झाली 1950 मध्ये या समितीचे राज्य घटनेनुसार पुर्नस्थापना करण्यात आली. या समितीत लोकसभेतील 15 व राज्यसभेतील 7 असे एकूण 22 सदस्य असतात. सार्वजनिक पैसा अंदाजपत्रिकीय नियमानुसार खर्च होतो किंवा नाही. मंजूरीपेक्षा जास्त पैसा खर्च झाल्यास त्याचा अहवाल देणे असे काम ही समिती करते.

२] अंदाज समिती :-

या समितीची स्थापना १९५० मध्ये झाली तिच्यात ३० सदस्य असतात. हे सर्वजण लोकसभेतील असतात. राज्यसभेतील एकही सदस्य नसतो. सार्वजनिक कार्यात काटकसर करणे, कार्यक्षमता वाढवणे, या विषयी धोरण ठरविण्याचे काम ही समिती करते.

३] सार्वजनिक उपक्रम समिती :-

१९६४ मध्ये सार्वजनिक उपक्रम समितीची स्थापना झाली. या समितीत लोकसभेतून १० व राज्यसभेतून ५ असे एकूण १५ सदस्य असतात. ही समिती सार्वजनिक उदयोगधंदे, व्यापारी तत्वावर चालविले जातात की नाही हे तपासण्याचे काम करते तसेच सार्वजनिक उदयोगधंदयाची हिशोब महालेखा परिक्षकेकडून तपासले जातात.

# प्रकरण चार. कार्यकारी अधिकारी.

**प्रश्न १. राष्ट्रपतीची पात्रता, निवडणूक पद्धती व अधिकार कामे स्पष्ट करा.**

**अ. प्रस्तावना : -**

राष्ट्रपती शासनाचे घटनात्मक प्रमुख आहेत. देशातील संपूर्ण राज्यकारभार राष्ट्रपतींच्या नावाने चालतो. ते भारताचे पहिले नागरिक आहेत. तीनही सेनांचे ते सेनाप्रमुख आहेत. राष्ट्रपतीचे पद अतिशय मानाचे आहे. पण प्रत्यक्षात मात्र ते नाममात्र प्रमुख आहेत.

**ब. राष्ट्रपतीपदासाठी योग्यता : -**

१) तो भारताचा नागरिक असावा.

२) त्याचे वय कमीतकमी ३५ वर्षे असावे.

३) लोकसभेच निवडून येण्याची क्षमता.

४) केंद्रसरकार किंवा राज्यसरकारचा आर्थिक प्राप्ती होणाऱ्या पदावर ती व्यक्ती नसावी.

५) राष्ट्रपती संसदेचा किंवा घटकराज्यातील विधानमंडळाचा सदस्य राहू शकत नाही.

६) राष्ट्रपतीची निवडणूक लढविण्याचे नाव निर्वाचक मंडळाच्या कमीतकमी दहा सदस्यांनी सुचविले पाहिजे. तसेच अन्य दहा सदस्यांनी त्याला अनुमोदन दिले पाहिजे.

**क. राष्ट्रपतींची निवडणूक : -**

राष्ट्रपतींची निवडणूक प्रत्यक्ष जनतेद्वारे न होता जनतेकडून निवडलेल्या प्रतिनिधींमार्फत होते. राष्ट्रपतींची निवडणूक अप्रत्यक्ष, गुप्त मतदान व एकलसंक्रमणीय पद्धतीने होते. त्यासाठी संसदेच्या दोन्ही सभागृहातील व  राज्याच्या विधानसभेतील निर्वाचित सदस्यांचे निर्वाचक मंडळ तयार केले जाते. ते मत देताना राष्ट्रपती पदासाठी उभा असलेल्या उमेदवारांच्या नावापुढे पसंतीक्रमांक लिहितो.

**ड. कार्यकाल व महाभियोग: -**

घटनेनुसार राष्ट्रपतींचा कार्यकाल पाच वर्षांचा असतो. राष्ट्रपतींनी घटनाभंगाचा गंभीर गुन्हा केल्यास त्यांना महाभियोग खटल्याद्वारे पदच्युत करता येते. तसा आरोप कोणतेही सभागृह राष्ट्रपतींवर ठेवू शकते. जे सभागृह आरोप ठेवणार आहे, त्यातील १/४ सदस्यांनी सह्या करून तशी लेखी सूचना १४ दिवस आधी द्यावी लागते. हे आरोपपत्र त्या सभागृहात एकूण सदस्यांच्या बहुमताने व उपस्थित राहून मतदान करणाऱ्यांच्या २/३ मताने समंत झाले पाहिजे. तसा ठराव पास झाल्यास तो दुसऱ्या सभागृहासमोर चर्चेला येईल. त्यावेळी राष्ट्रपतींना आपले बचावाचे भाषण करण्याची संधी मिळते. चौकशीनंतर दुसऱ्याही सभागृहात तो ठराव एकूण सदस्यांच्या उपस्थित राहून मतदान करणाऱ्यांच्या २/३ मताने पास झाल्यास राष्ट्रपतींना पदच्युत करता येते.

**इ. घटनात्मक अधिकार आणि कार्ये : -**

राष्ट्रप्रमुख या नात्याने राष्ट्रपतींना अत्यंत व्यापक अधिकार दिलेले आहेत. परंतु राष्ट्रपती हा नाममात्र शासक असल्याने प्रत्यक्षात त्यांचे सर्व अधिकार पंतप्रधानच वापरतात. राष्ट्रपतींच्या घटनात्मक अधिकारांचे वर्गीकरण पुढील प्रकारे करता येते.

**१) शासनविषयक अधिकार :**

घटनेनुसार संघराज्याच्या शासनाचे सर्व अधिकार राष्ट्रपतींना आहेत. त्यांना शासनाचे संचालक, नियंत्रण व मार्गदर्शन करावे लागते. आपल्या मदतीसाठी ते पंतप्रधान व मंत्रिमंडळातील इतर सदस्यांची नियुक्ती करतात. भारत सरकारचा सर्व राज्यकारभार राष्ट्रपतींच्या नावाने चालतो. राज्यपाल, महाधिवक्ता, महालेखापरीक्षक, सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, राजदूत, लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष व इतर सदस्य या सर्व महत्त्वाच्या नेमणूका राष्ट्रपती करतात. याशिवाय अनुसूचित जातींकरिता विशेष अधिकारी राष्ट्रपतीच नियुक्त करतात. वित्त आयोग,भाषा आयोग, योजना आयोग, निर्वाचन आयोग त्यांच्या मार्फतच केली जाते. राष्ट्रपती हे तिन्ही सेनादलांचे सरसेनापती असतात. भारतातील सर्व राजनयिक अधिकाऱ्यांची नियुक्ती राष्ट्रपतींमार्फत होते. राष्ट्रपतींना दुसऱ्या देशांशी युद्ध पुकारण्याचा तसेच तह करण्याचा अधिकार आहे.

**२) कायदेविषयक अधिकार :**

राष्ट्रपती हे संसदेचे एक अभिन्न अंग आहे. कायदेविषयक क्षेत्रात त्यांना महत्त्वपूर्ण अधिकार आहेत. राष्ट्रपतींच्या संमतीशिवाय कोणतेच विधेयक कायद्यात रुपांतरीत होऊ शकत नाही. संसदेने संमत केलेल्या विधेयकाला राष्ट्रपती संमती देतात. त्यात सुधारणा सुचवू शकतात किंवा ते अस्वीकृत करू शकतात. अस्विकृत केलेले विधेयक किंवा परत पाठवलेले विधेयक जर संसदेने त्याच स्वरुपात पुन्हा परत पाठविले तर राष्ट्रपतींना त्या विधेयकाला स्वीकृती द्यावीच लागते. म्हणजेच या बाबतीत राष्ट्रपतींचा अधिकार अमर्यादित नाही.

वित्त विधेयक, एखाद्या घटक राज्याचे नाव किंवा सीमा बदलणारे विधेयक, व्यापारावर प्रतिबंध लावण्यासंबंधीचे विधेयक यासारखी विधेयके राष्ट्रपतींच्या पूर्वसंमतीशिवाय मांडता येत नाहीत. तसेच राष्ट्रपती साहित्य, कला, विज्ञान, समाजसेवा यातील १२ तज्ञांची नियुक्ती राज्यसभेवर करू शकतात. जर अँग्लोइंडियन लोकांना लोकसभेत योग्य प्रतिनिधीत्व मिळाले नसेल तर राष्ट्रपती दोन अँग्लोइंडियन सदस्य लोकसभेत नियुक्त करू शकतात.

संसदेचे अधिवेशन बोलावने, संसदेच्या संयुक्त अधिवेशनात भाषण करण्याचा अधिकार त्यांना आहे. घटकराज्याच्या विधानमंडळाने संमत केलेली काही विशिष्ट विधेयके राज्यपालांना राष्ट्रपतींच्या स्विकृतीसाठी पाठवावी लागतात. त्यांना स्वीकृती देणे. तसेच राष्ट्रपतींना लोकसभा विसर्जित करणे असे विविध अधिकार त्यांना आहेत.

**३) अर्थविषयक अधिकार :**

राज्यघटनेने राष्ट्रपतींना महत्त्वपूर्ण आर्थिक अधिकार प्रदान केले आहेत. कोणतेही वित्त विधेयक राष्ट्रपतींच्या संमतीशिवाय संसदेत मांडता येत नाहीत. दरवर्षीचे अंदाजपत्रक राष्ट्रपती अर्थमंत्र्यांमार्फत संसदेत मांडतात. संचित निधीवर राष्ट्रपतींचेच नियंत्रण असते. आकस्मिक कारणांसाठी ते त्यातून खर्च करू शकतात. अशा खर्चाला संसदेच्या पूर्व संमतीची आवश्यकता नसते. नंतर संमती घेतली तरी चालते. वेळोवेळी वित्त आयोगाची नियुक्ती करून केंद्र व राज्य यांच्यात होणाऱ्या कराच्या राशीच्या विभागणीबाबत ते सल्ला देऊ शकतात.

**४) न्यायविषयक अधिकार :**

सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची नियुक्ती राष्ट्रपतींद्वारेच केली जाते. राष्ट्रपतींना क्षमा करण्याचा अधिकार आहे. ते एखाद्या व्यक्तीची शिक्षा कमी करू शकतात किंवा रद्दही करू शकतात.

**५) आणिबाणी विषयक अधिकार :**

भारतीय राज्यघटनेने राष्ट्रपतींना आणिबाणीविषयक अधिकार दिले आहेत. राष्ट्रपती या अधिकारांचा उपयोग तीन प्रकारच्या आणिबाणीच्या परिस्थितीत करतात.

१) युद्ध किंवा आंतरिक बंड

२) राज्यामध्ये घटनेप्रमाणे राज्यकारभार चालविणे कठीण झाल्यास.

३) भारताच्या किंवा भारतातील कोणत्याही भागाच्या आर्थिक स्थैर्याला धोका उत्पन्न झाल्यास.

**ई. सारांश –**

राष्ट्रपतींना व्यापक आणिबाणीविषयक अधिकार दिले असले तरी भारतात संसदीय पद्धतीचा स्विकार केलेला आहे हे विसरून चालणार नाही. या पद्धतीत वास्तविक अधिकार हे मंत्रीमंडळाकडे असतात.

**प्रश्न २. केंद्रीय मंत्रीमंडळाची रचना, मंत्रीमंडळाची वैशिष्ट्ये व कार्ये स्पष्ट करा.**

**अ. केंद्रीय मंत्रीमंडळ :**

भारतामध्ये राष्ट्रपती हे घटनात्मक प्रमुख आहेत. वास्तविक कार्यपालिका व सत्ता मंत्रीमंडळाच्या हाती असते. मंत्रीमंडळ सामूहिकरीतीने लोकसभेला जबाबदार असते. राज्यघटनेतील ७४ व्या कलमाप्रमाणे राष्ट्रपतींना त्यांच्या कार्यात मदत करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी मंत्रीमंडळाची व्यवस्था करण्यात आली आहे.

**ब. भारतीय मंत्रीमंडळाची वैशिष्ट्ये :**

**१) नाममात्र कार्यपालिका** :

भारतात घटनेप्रमाणे संसदीय पद्धती स्विकारली आहे. त्याप्रमाणे राष्ट्रपती हे नाममात्र आहेत. सर्व कार्यपालिका सत्ता वास्तविक मंत्रीमंडळाच्या हाती असते. मंत्रीमंडळाच्या सल्ल्यानुसार राष्ट्रपती कार्य करतात.

**२) संसद आणि कार्यपालिकेचा घनिष्ट संबंध** :

भारतातील मंत्रीपरिषदेचे सदस्यांना संसदेचे सदस्य असावेच लागते. मंत्रीमंडळातील सदस्य बहुधा लोकसभेतील बहुमताच्या पक्षातील असतात. मंत्रीमंडळ म्हणजे संसद आणि राष्ट्रपती यांना जोडणारा दुवा आहे.

**३) राजनीतिक एकता आणि कार्याची एकता :**

राजनीतिक एकता म्हणजे मंत्रीमंडळातील सदस्य साधारणत: एकाच पक्षाचे असतात. त्यामुळे त्यांच्या विचारात एकरुपता असते. सहचारिता याचा अर्थ कार्याची एकता होय. म्हणजे पूर्ण मंत्रीमंडळ एका संघाप्रमाणे काम करते. मंत्रीमंडळातील सदस्यांचे वैयक्तिक मत काहीही असो, त्यांना मंत्रीमंडळाच्या धोरणाचे समर्थन करावे लागते. नीतीचे समर्थन न केल्यास मंत्र्याला राजीनामा द्यावा लागतो.

**४) गोपनीयता :**

मंत्रीमंडळाने घेतलेले निर्णय गुप्त ठेवले जातात. मंत्रीमंडळातील मतभेद साधारण जनतेला कळू नयेत. हा त्यामागील उद्देश असतो. तसेच ते राष्ट्रहिताचे रक्षक आहेत असे देखील समजले जाते. म्हणून भारतातील मंत्र्यांना प्रथम गोपनीयतेची शपथ घ्यावी लागते.

**५) पंतप्रधानांचे नेतृत्व :**

मंत्रीमंडळ प्रणाली पंतप्रधानांच्या सर्वोच्चतेच्या सिद्धांतावर आधारित आहे. प्रधानमंत्री मंत्रीमंडळाचा नेता असतो. तोच मंत्र्याची नियुक्ती करतो. मंत्र्यांमधील खातेविभागणी तेच करतात. वास्तविक पंतप्रधानांची इच्छा असेपर्यंत मंत्री आपल्या पदावर राहू शकतात. पंतप्रधानांचा विश्वास गमावल्यास मंत्र्यांपुढे राजीनामा द्यावा लागतो.

**६) सामूहिक जबाबदारी :**

मंत्रीमंडळ प्रणाली शासनपद्धतीचा हा मूलभूत सिद्धांत आहे. मंत्री सामूहिक रुपात जबाबदार असतात. मंत्रीमंडळ हे एखाद्या संघाप्रमाणे असते. सामूहिक जबाबदारी म्हणजे एकासाठी सर्व आणि सर्वांसाठी एक होय. त्यामुळे एका मंत्र्यावरील अविश्वास म्हणजे पूर्ण मंत्रीमंडळावरी अविश्वास ठरतो.

**क. मंत्रीमंडळाचे कार्य :**

मंत्रीपरिषदेतील प्रमुख सदस्यांच्या समितीला मंत्रीमंडळ म्हणतात. मंत्रीमंडळ हीच वास्तविक कार्यपालिका आहे. मंत्रीमंडळाला प्रशासकीय, आर्थिक कायदेविषयक क्षेत्रात महत्त्वपूर्ण अधिकार प्राप्त आहेत.

**१) प्रशासकीय कार्य :**

राष्ट्राच्या किंवा आंतरराष्ट्रीय संबंधांच्या बाबतीत धोरण ठरवणे हे मंत्रीमंडळाचे प्रमुख कार्य आहे. मंत्रीमंडळातील निर्णय बहुधा विधेयकाच्या रुपात संसदेत ठेवले जातात. मंत्रीमंडळ कायदे निर्मितीच्या क्षेत्रात संसदेचे नेतृत्व करते. जोपर्यंत मंत्रीमंडळाचे बहुमत संसदेमध्ये असते. तोपर्यंत मंत्रीमंडळ पाहिजे ते विधेयक मान्य करून घेते. संसदेने स्वीकृत केलेले कायदे अंमलात आणण्याचे कार्य मंत्रीमंडळाचेच असते. आजकाल प्रदत विधेयकामुळे मंत्रीमंडळाचे अधिकारक्षेत्र खूपच वाढले आहे. त्यामुळे संसद विधेयकाची केवळ रुपरेखा मान्य करते. त्या रुपरेखेला पूर्णत्व देण्याचे कार्य त्या त्या विभागाचे अध्यक्ष म्हणजे मंत्री करतात.

**२) आर्थिक अधिकार :**

मंत्रीमंडळ राज्यासाठी खर्च होणाऱ्या संपूर्ण पैश्यासाठी व तो एकत्रित करण्यासाठी जबाबदार असते. पुढील वर्षीचे अंदाजपत्रक मंत्रीमंडळच तयार करून संसदेत मांडते. अंदाजपत्रक संसदेत मांडण्यापूर्वी मंत्रीमंडळाची स्विकृती घेतली जाते. विविध विभागातील मंत्री आपापल्या विभागाची आवश्यकता अर्थमंत्र्याला कळवीतात.

**३) कायदेविषयक कार्ये :**

भारतीय मंत्रीमंडळ कायदेनिर्मितीच्या बाबतीत संसदेचे नेतृत्व करते. संसदेच्या कोणत्या अधिवेशनात कोणते विधेयक मांडाययचे हे मंत्रीमंडळच ठरवते. या बाबतीत मंत्रीमंडळाचे मंत्रीपरिषदेवर पूर्ण आणि प्रभावशाली नियंत्रण असते. मंत्रीमंडळ आपल्या पक्षाच्या संसदेतील बहुमताच्या पाठिंब्यावर प्रस्तावित विधेयक मान्य करून घेते.

**प्रश्न 3. पंतप्रधानांच्या शक्तीची उगमस्थाने व कार्ये स्पष्ट करा.**

**अ. पंतप्रधान :**

राज्यघटनेनुसार पंतप्रधानांची नियुक्ती करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना आहे. प्रत्यक्षात मात्र पंतप्रधान नियुक्त करण्याचा राष्ट्रपतींचा अधिकार नाममात्र आहे. राष्ट्रपती लोकसभेत बहुमत प्राप्त केलेल्या पक्षाच्या नेत्याला पंतप्रधान म्हणून नियुक्त करतात. मंत्रीमंडळाला लोकसभेचा विश्वास संपादन करावा लागतो. बहुमत प्राप्त पक्षाच्या नेत्यालाच बहुमताचा पाठिंबा मिळू शकतो. परंतु जेव्हा लोकसभेमध्ये कोणत्याच पक्षाला बहुमत प्राप्त झाले नसेल तर संयुक्त मंत्रीमंडळ बनविण्याचा प्रश्न निर्माण होतो. अशावेळी राष्ट्रपती आपल्या विवेकानुसार पंतप्रधानांची नियुक्ती करु शकतात.

**ब. पंतप्रधानांच्या शक्तीची उगमस्थाने :**

**१) राज्यघटना :** राज्यघटनेनुसार, पंतप्रधान हा मंत्रीपरिषदेचे प्रमुख म्हणून काम पाहतील.

**२) संसदीय पद्धती :** संसदीय प्रणालीची सत्ता ही परंपरा व संकेतावर विकसित झाली आहे. या प्रणालीत पंतप्रधानांना जास्त महत्त्वाचे स्थान आहे.

**३) बहुमत प्राप्त केलेल्या पक्षाचा नेता :** पंतप्रधानांच्या सत्तेचा प्रमुख आधार म्हणजे पक्षांतर्गत राजकारणाचा विकास होय. बहुमत प्राप्त केलेल्या पक्षाचे ते नेते असतात.

**४) सामान्यांच्या हितांचा रक्षक :** पंतप्रधानांची स्थिती पक्षीय संघटनेमुळे इतकी मजबूत असते की, ते वर्गीय हितापेक्षा जनतेच्या हिताकडे अधिक लक्ष देऊ शकतात.

**क. पंतप्रधानांची कार्ये :**

**१) मंत्रीमंडळाची निर्मिती :**

पंतप्रधानांचे पहिले कार्य म्हणजे मंत्रीमंडळाची निर्मिती करणे होय. मंत्रीमंडळाची निर्मिती हे अत्यंत कठीण काम असते. पक्षीय संघटन, निवडणुकीतील मदत, अनुभवी ज्येष्ठ नेते, निरनिराळी घटकराज्ये या सर्वांचाच विचार करावा लागतो. पंतप्रधान मंत्रीमंडळाच्या बैठकीचे अध्यक्ष असतात. मंत्रीमंडळाचे धोरण ठरविण्यात पंतप्रधानांची प्रमुख भूमिका असते. पंतप्रधान मंत्रीमंडळाचे मार्गदर्शक असतात. ते सर्व विभागांमध्ये समन्वय साधतात. पंतप्रधानांच्या अस्तित्वावर इतर मंत्र्यांचे अस्तित्व अवलंबून असते. पंतप्रधानांच्या राजीनाम्याबरोबर पूर्ण मंत्रीपरिषदच भंग होते. म्हणूनच पंतप्रधान म्हणजे मंत्रीमंडळाची आधारशीला आहे.

**२) पक्षनेता :**

पंतप्रधान हे शासनाचे प्रमुख तर असतातच पण ते बहुमत प्राप्त केलेल्या पक्षाचे प्रतीक देखील समजले जातात. एकदा एखाद्या व्यक्तीला पंतप्रधान बनविल्यानंतर त्यांना काढणे फारच कठीण काम असते.

**३) संसदेचे नेतृत्व :**

पंतप्रधान आपल्या पक्षाबरोबरच संपूर्ण संसदेचे नेतृत्व करतात. बहुतेक सरकारी विधेयके पंतप्रधानांच्या सल्ल्याने तयार होतात. वार्षिक अंदाजपत्रक तयार करण्यात पंतप्रधानांचा प्रमुख हात असतो. पंतप्रधान लोकसभा विसर्जित करण्याचा सल्ला राष्ट्रपतीला देऊ शकतात. पंतप्रधानांच्या सल्ल्यानुसार राष्ट्रपती लोकसभा भंग करू शकतात. पंतप्रधानांचा हा अधिकार म्हणजे लोकसभेत अनुशासन ठेवण्याचे महत्त्वाचे साधन आहे.

**४) राष्ट्रपती व मंत्रीमंडळ यांच्यातील दुवा :**

पंतप्रधान म्हणजे राष्ट्रपती व मंत्रीमंडळ यांना जोडणारा दुवा समजला जातो. मंत्रीमंडळाने घेतलेले निर्णय राष्ट्रपतींपर्यंत पोहचविण्याचे कार्य पंतप्रधान करतात.

**५) आंतरराष्ट्रीय प्रतिनिधी :**

आंतरराष्ट्रीय क्षेत्रांमध्ये भारतीय पंतप्रधानांचे स्थान महत्त्वाचे महत्त्वपूर्ण आहे. विदेश नीतीवर त्यांचे पूर्ण नियंत्रण असते. विदेश विभाग त्यांच्याकडे नसला तरी विदेश नीतीचा निर्माता तेच असतात. अनेकवेळा आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये ते स्वत: जाऊन आंतरराष्ट्रीय संबंधाबाबत चर्चा करतात. विदेश नीतीला आकार देण्याचे काम पंतप्रधान करतात.

**६) नियुक्तीचा अधिकार :**

सर्व महत्त्वाच्या नियुक्त्या करणे हा राष्ट्रपतींचा अधिकार आहे. पण प्रत्यक्षात सर्वच नियुक्त्या पंतप्रधानांच्या सल्ल्याने होतात. राजदूत निर्वाचन आयोग, लोकसेवा आयोग, राज्यपाल इ. सर्वच नियुक्त्यात पंतप्रधानांचा हात असते.

**७) आणिबाणी विषयक अधिकार :**

भारतीय घटनेने आणीबाणी विषयक अधिकार राष्ट्रपतींना दिले असले तरी प्रत्यक्षात त्यांचा उपयोग पंतप्रधान करतात. कोणत्या राज्यात राष्ट्रपती राजवट सुरू करायची हेदेखील पंतप्रधान ठरवतात. अशा रीतीने संसदीय लोकशाही प्रणालीत वास्तविक अधिकार पंतप्रधान आणि मंत्रीमंडळाला असतात.

**प्रश्न ४. स्थानिक स्वराज्य संस्था - ७३वी, ७४वी घटनादुरुस्तीचे स्वरुप व महत्त्व विषद करा.**

**अ. प्रास्ताविक :**

भारत हा बहुसंख्य खेड्यांनी बनलेला आहे. भारतात खेडे हे एका सामाजिक जीवनाचे केंद्रस्थान होते. आजसुद्धा स्थानिक प्रशासनात ग्रामीण भाग महत्त्वाचा आहे. भारतात आजही ग्रामीण जनतेचे प्रमाण शहरी जनतेपेक्षा बरेच जास्त आहे. पंचायती राज्य ही संकल्पना स्थानिक प्रशासन संदर्भात आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांची आवश्यकता खेड्यांप्रमाणे शहरातही भासते, कारण शहरे आणि खेडी मिळूनच भारत देश बनलेला आहे. शहरांचा विकास चांगल्या रीतीने व्हावा या उद्देशाने शहरातही स्वराज्य संस्था निर्माण करण्यात आल्या आहेत.

**ब. ७३वी घटनादुरुस्ती :**

२० एप्रिल १९९३ रोजी पंचायतीराज विषयक ७३वी घटनादुरुस्ती करण्यात आली. आणि त्यामुळे गावापासून राज्यापर्यंत एक समान कार्यपद्धती लागू करण्यात आली. त्यालाच पंचायत राज्यपद्धती म्हटले जाते. या माध्यमातून गाव, तालुका, जिल्हा व राज्य याविषयी विकासात्मक दृष्टीकोन स्वीकारून त्या त्या स्तरावर स्थानिक स्वराज्य संस्था स्वीकारून त्या त्या स्तरावर स्थानिक स्वराज्य संस्था व शासन यांच्या समन्वयातून देशाचा राज्यकारभार व्हावा यासाठी विविध प्रयत्न करण्यात आले.

**i. ७३व्या घटनादुरुस्तीचे स्वरुप :**

७३व्या घटनादुरुस्तीमुळे गाव तेथे ग्रामपंचायत, तालुका तेथे पंचायत समिती आणि जिल्हा तेथे जिल्हा परिषद अशा स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती करण्यात आली. पंचायत कायद्याला त्यामुळे वैधानिक आणि संविधानिक असे स्वरूप प्राप्त झाले. तालुका स्तरावर ग्रामपंचायतीप्रमाणे पंचायत समितीची निर्मिती करण्यात आली. जिल्हा परिषद व ग्रामपंचायत यांच्यामध्ये समन्वयक म्हणून पंचायत समित्यांची भूमिका महत्त्वाची ठरते. तालुका स्तरावर

सभापती हे पंचायत समितीचे पालकत्व करु लागले. लोकसंख्येच्या निकषाप्रमाणे प्रभाग ठरविण्यात आले व त्याप्रमाणे तालुक्याचा कारभार चालू लागला. जिल्हा स्तरावर जिल्हा परिषदांची निर्मिती झाली. जिल्हा परिषदेच्या कामकाजाचे पालकत्व अध्यक्षांकडे सोपविण्यात आले. तर शासकीय प्रमुख पदाची जबाबदारी जिल्हा स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सोपविण्यात आली. ३५,००० संख्येसाठी एक जिल्हापरिषद सदस्य निवडून देऊन ५० ते ७५ इतकी जिल्हापरिषद सदस्यांची मर्यादा ठरविण्यात आली. अशा निवडून आलेल्या जिल्हा परिषद सदस्यांमधून जिल्हा परिषदेच्या अध्यक्षाची नियुक्ती करण्यात येते.

**ii. ७३ व्या घटनादुरुस्तीचे महत्त्व :**

१) ७३ व्या घटनादुरुस्तीमुळे पंचायतराज पद्धतीला घटनात्मक दर्जा मिळाला. त्यामुळे नव्या पंचायतीराज व्यवस्थेची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे बंधन राज्य सरकारवर आले.

२) ७३व्या घटनादुरुस्तीमुळे ११ व्या अनुसूचीमध्ये २९ विषयांचे हस्तांतरण पंचायती राज्यसंस्थांना करण्यात आलेले आहे. त्यामुळे जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत या संस्थांची जबाबदारी वाढली.

३) ७३व्या घटनादुरुस्ती झाल्यामुळे महिलांना ३३% आरक्षण देण्यात आलेले आहे. यामुळे मोठ्या संख्येने महिला राजकीय क्षेत्रात सामाजिक कार्य करण्याकरिता पुढे आलेल्या आहेत.

४) ७३ वी घटनादुरुस्ती प्रामुख्याने लोकशाहीचा विकास, सामाजिक न्याय, महिलांचा विकास तसेच नियोजन प्रक्रियेत जास्तीतजास्त लोकांचा सहभाग या कारणासाठी करण्यात आली.

५) भारतातील सर्व राज्यांमध्ये गाव पातळी, तालुका पातळी व जिल्हा पातळी अशा तीनही पातळ्यांवर पंचायतराज पद्धती सुरु झाली. महाराष्ट्रात १९५९ च्या मुंबई ग्रामपंचायत अधिनियमाने आणि १९६१ च्या महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समित्या अधिनियमानुसार आधीच सुरू झाल्या होत्या. ७३व्या घटनादुरुस्तीमुळे या योजनेला कायदेशीर स्वरुप प्राप्त झाले. त्यामुळे या तीनही पातळीवरील स्थानिक स्वराज्य संस्थांचा दैनंदिन कारभार कायद्याचा आकृतीबंधात चालविला जातो.

**क. ७४वी घटनादुरुस्ती :**

१९९२ च्या ७४ व्या घटनादुरुस्तीपूर्वी नागरी स्वराज्य संस्था राज्य सरकारवर अवलंबून होत्या. त्यामुळे नागरी प्रशासनात नेहमीच अस्थिरता व सातत्याचा अभाव होता. ७४ व्या घटनादुरुस्तीनंतर नागरी प्रशासनातील संस्था, नगरपरिषदा व महानगरपालिका आणि इतर संस्था यांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला.

**i. ७४व्या घटनादुरुस्तीचे स्वरुप :**

७४ व्या घटनादुरुस्तीचा उद्देश स्थानिक शासन संस्थांच्या कारभारात सुधारणा घडवून आणणे. तसेच लोकशाही विकेंद्रीकरण अधिक प्रभावी करणे हा होता. ७४ वी घटनादुरुस्ती

नगरपालिका, नगरपंचायत, महानगरपालिका यासंबंधी आहे. ग्रामीण आणि नागरी अशा दोन्ही क्षेत्रांशी संबंधित असलेली नियोजन आणि विकास समितीची तरतूद केवळ ७४ व्या घटनादुरुस्तीतच करण्यात आली आहे. या घटनादुरुस्तीमुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे नियम कसे असावेत याविषयी मापदंड निश्चित करण्यात आले. महाराष्ट्र राज्य विधीमंडळाने ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्तीतील तरतुदींशी सुसंगत अशा दुरुस्त्या राज्यातील ग्रामीण व नागरी संस्थाविषयक कायद्यांमध्ये १९९४ साली केल्या. ७४ व्या घटनादुरुस्तीनुसार शहरी भागात वित्त आयोग, निवडणूक आयोग अश्या स्वयंशासनाच्या तरतुदी केल्या आहेत. या घटनादुरुस्तीने नागरी शासन संस्थांना घटनात्मक स्थान प्राप्त झाले.

**ii. ७४ व्या घटनादुरुस्तीचे महत्त्व :**

७४ व्या घटनादुरुस्तीनुसार शहरी भागात व शहरीकरणाच्या दिशेने चाललेल्या छोट्या शहरामध्ये त्याच्या लोकसंख्येनुसार महानगरपालिका, नगरपालिका व नगर पंचायतीची स्थापना करण्यत आली. ज्या पद्धतीने ७३ व्या घटनादुरुस्तीने ग्रामीण जनतेला सत्ता प्राप्त झाली. त्याच पद्धतीने ७४ व्या घटनादुरुस्तीने शहरी भागातील लोकांच्या हाती सत्तेची चावी आली. कोणत्याही शहराचा विकास करण्यासाठी तेथील नागरिकांना समाविष्ट केल्याशिवाय त्याचा विकास होवू शकत नाही. हे तत्त्व या घटनादुरुस्तीने मान्य केले. प्रत्येक शहराचा नियोजनबद्दल विकास व्हावा, पारदर्शी कारभार चालावा, प्रगतीला वेग मिळावा इ. उद्देश ठेवून शहरी भागातील शासन संस्थांना पुरेसे अधिकार प्राप्त झाले. वाढती लोकसंख्या, प्रशासनाच्या विविध जबाबदाऱ्या, लोकशाहीचे बळकटीकरण इ. बाबींसाठी केंद्रीकृत प्रशासन व्यवस्थाही निकामी ठरते. अशावेळी सत्तेचे विकेंद्रीकरण करणे ही काळाची बाब ठरते. ७४ व्या घटनादुरुस्तीने काळाची पावले ओळखून सत्तेचे योग्य पद्धतीने विकेंद्रीकरण केल्याचे दिसून येते. शहरी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये निवडून आलेले लोकप्रतिनिधी व सरकारचे प्रशासकीय अधिकारी यांचा योग्य समन्वय झाल्याचे दिसते. ७४ व्या घटना दुरुस्तीनुसार अनेक घटक राज्यांनी आपल्या कायद्यात बदल करून लोकशाहीच्या विकेंद्रीकरणास सुरुवात केली.